बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा, शनिवार दिनांक २४.२.२००१ रोजी दुपारी १.०० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत" बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित

१. मा. श्री. सुनील केदार — अध्यक्ष
२. मा. सौ. आशाताई महाजन — उपाध्यक्षा
3. मा. श्री. स. लि. चोरे — सदस्य
४. मा. श्री. वि. रा. हुलके — ”
५. मा. श्री. ना. र. जीभकाटे — ”
६. मा. श्री. वि. वि. निमजे — ”
७. मा. श्री. र. व्यं. निमजे — ”
८. मा. श्री. मु. भि. पन्नासे — ”
९. मा. श्री. चं. तु. समर्थ — ”
१०. मा. श्री. एस. एस. गोडे — प्र. व्यवस्थापक

अनुपस्थित

१. मा. श्री. अ. रा. गुप्ता — सदस्य
२. मा. श्री. ब. भा. तायवाडे — ”
3. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
४. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक), नागपूर.
५. मा. विभागीय अधिकारी, महा. राज्य सह. बँक मर्या. विभा. कार्यालय नागपूर.
६. मा. श्री. ए. एन. चौधरी — सरव्यवस्थापक.

समितीचे सभासद श्री. अ. रा. गुप्ता व श्री ब. भा. तायवाडे सभेला अनुपस्थित असल्याबद्दल यांचे अनुपस्थितीची नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थिती ची रजा मंजूर करण्यांत आली. तसेच बँकेचे सरव्यवस्थापक कर्ज वसुलीचे रॅली सभेला गेले असल्याने सभेला उपस्थित नाहीत. याबाबत सभेला माहिती देण्यांत आली.

यानंतर उपस्थितांचे स्वागत करुन विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरुवात करण्यांत आली.

विषय क्रमांक १ :- मागील सभा दिनांक १७.१.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ — मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील सभा दिनांक १७.१.२००१ रोजी झालेल्या सभेचे -

प्रलंबित सर्वानुमते कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २ :- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक १८.१.२००१ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची प्रभारी व्यवस्थापक यांनी थोडक्यांत माहिती दिली. ठराव क्र. ५(२)चे कार्यवाही संदर्भात माहिती देतांना मा० अध्यक्ष म्हणाले की, संगणीकरणासाठी सॉफ्टवेअर बाबत अंतिम निर्णय झाल्यानंतर हार्डवेअर साठी खरेदीसाठी प्राप्त झालेल्या कोटेशन बाबत निर्णय घेण्यांत येईल. कार्यालयाने केलेल्या कार्यवाही संदर्भात दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ :- बँकेच्या माहे डिसेंबर २००० मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा करतांना मा. श्री. पन्नासे संचालक म्हणाले की, खर्चाचे स्टेटमेंट डिसेंबर २०००चे आहे. परंतु खर्चाबाबतची माहिती दिनांक २९.१२.२००० पर्यंतचीच देण्यांत आल्याचे स्टेटमेंटवरुन दिसत आहे. यावर बँकेचे प्र. व्यवस्थापक यांनी सांगितले की, डिसेंबर २००० या महिन्यातील शेवटचा शुक्रवार दिनांक २९.१२.२०००चा आहे. बँकेची आर्थिक पत्रके महिन्याच्या शेवटच्या शुक्रवारला येत असलेल्या तारखेची तयार केली जातात. ह्याप्रमाणे माहे डिसेंबर २०००चे खर्चाचे स्टेटमेंट (डिसेंबर २००० चा शेवटचा शुक्रवार) २९.१२.२०००चे तयार करण्यांत आले आहे. मा० अध्यक्ष यांनी दिलेल्या परवानगीनुसार डिसेंबर २०००चे किरकोळ खर्चाचे स्टेटमेंट सोबतच जानेवारी २००१चे स्टेटमेंट मान्यतेसाठी ठेवण्यांत आले आहे. सविस्तर चर्चा होऊन माहे डिसेंबर २००० व जानेवारी २००१ या महिन्यातील खर्चाबाबत सविस्तर चर्चा होऊन माहे डिसेंबर २००० व जानेवारी २००१ मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

---

विषय क्रमांक ४ :- बँकेच्या माहे २६ जानेवारी २००१ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला औद्योगिकच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या २६ जानेवारी २००१चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला औद्योगिकच्या परिस्थितीची नोंद घेण्यांत आली. २०००-२००१ या वर्षात ठरविण्यात आलेल्या उद्दिष्टानुसार मार्च २००१ अखेर.

रुपये ५००.०० कोटी ठेवी गोळा करावयाच्या आहेत. २६ जानेवारी २००१ चे ताळेबंदानुसार बँकेत रुपये ४६०.०० कोटीच्या ठेवी आहेत. रुपये ५००.०० कोटी ठेवीचे उद्दिष्ठ पूर्ण करण्यासाठी अजून रुपये ४०.०० कोटी ठेवी गोळा करावयाच्या आहेत. आणि याकरिता फक्त एक महिन्याचा अवधी आहे.
यावर सविस्तर चर्चा होऊन मार्च २००१ अखेर रुपये ५००.०० कोटी ठेवीचे उद्दिष्ठ पूर्ण करणेकरिता बँकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी जोमाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. याकरिता १ मार्च ते १५ मार्च २००१ हा कालावधी बचत ठेव पंधरवाडा म्हणून घोषित करण्यांत यावा. बँकेत ठेवी आकर्षित होणेसाठी जनतेच्या मनांत नागपूर जिल्हा सहकारी बँकेत आपली ठेव असावी अशी भावना निर्माण होणेकरिता ठेवीबाबत बँकेचे अनेक विध योजनांना हँडबील काढून प्रसिध्दी देण्यांत यावी. दिनांक १ मार्च ते १५ मार्च २००१ हा कालावधी बचत ठेव पंधरवाडा म्हणून पाळण्यांत यावा. बचत ठेव पंधरवाडा बाबत कापडी बॅनर तयार करुन बँकेच्या शाखा कार्यालयांत, मुख्य कार्यालयांत दर्शनी भागावर लावण्यांत यावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५ :- मा. अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ५(१) - महाल येथील संकुलाकरिता बोअरवेल खोदण्याचे कोटेशन मंजूरीबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५(१) - मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, महाल येथील संकुल बांधकामाकरिता पाण्याची व्यवस्था करुन घेण्यासाठी बोअरवेल खोदणेकरिता भूगर्भ शास्त्रज्ञ श्री राव यांचेकडून जागा (स्पॉट) शोधण्यांत आली आहे. या ठिकाणी बोअरवेल खोदणेकरिता कंत्राटदारांकडील ४ प्रतिष्ठानांकडून कोटेशन प्राप्त झाले आहे.

१. जयगंगा बोअर वेल्स, नागपूर ...... रु. १५०/- प्रतिफुट
२. शाह बोअर वेल्स, नागपूर ...... रु. १६०/- प्रतिफुट
३. लक्ष्मी बोअर वेल्स, नागपूर .... रु. १४५/- प्रतिफुट
४. योगेश इंटर प्रायजेस, नागपूर .... रु. १४०/- प्रतिफुट

वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या कोटेशन बाबत तपशिलवार माहिती सोबतचे टिपणीमध्ये दिलेली आहे.
विषयावर सविस्तर चर्चा होऊन सर्वात कमी दर असलेले मे. योगेश इंटर प्रायजेस, नागपूर यांचे कोटेशन मंजूर करण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५(२) - बँकेच्या शाखा मारोडी येथील ग्राम पंचायतीचे मालकीच्या इमारतीचा नविन करारनामा करून घेणेबाबत.

ठराव क्रमांक ५(२) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेची मारोडी शाखा ४३० फुट शाखेत रुपये ७८४/- प्रतिमाह किरायाने आहे. सदर जागेचा दिनांक १ जानेवारी १९९४ ते ३१डिसेंबर १९९८ पर्यंतचे ५ वर्ष कालावधीकरिता करण्यांत आलेला किरायाबाबतचा ~~कि~~ करारनामा संपलेला आहे. करारनामा संपल्यामुळे दिनांक १ जानेवारी १९९९ पासून रुपये १५००/- प्रतिमाह किराया मिळावा अशी ग्रामपंचायतीची मागणी असून, बँकेचे नियमानुसार जेवढा किराया वाढविण्यांत येईल तेवढा किराया त्यांना मान्य राहिल असेही कळविले आहे. जुन्या किरायावर १५% वाढ दिल्यास रुपये ११६/- वाढ होईल व एकूण किराया रुपये ९००/- प्रतिमाह होईल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मारोडी ग्रामपंचायतीने मान्य केल्याप्रमाणे जुन्या किरायांत १५%ने वाढ करुन एकूण किराया रु.९००/- प्रतिमाह देण्यांत यावा व त्याप्रमाणे करारनामा करून घ्यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ५(३) - बँकेच्या बडेगांव शाखेकरिता किरायाने घेतलेल्या इमारतीत सोयीनुसार सिव्हील, फर्निशिंग, इलेक्ट्रीकल्सच्या कामाचे अंदाज पत्रक रुपये १३८३५३/- ला मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ५(३) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बडेगांव शाखेकरिता सावनेर खरेदी विक्री संस्थेच्या बडेगांव येथील इमारतीमधील ८७५ चौ. फुट जागा किरायाने घेतली असून त्याबाबत करारनामा करण्यात आलेला आहे. सदर जागेत बँकेच्या सोयीच्या दृष्टीने सिव्हील फर्निशिंग व इलेक्ट्रीकल्सची कामे करवून घेणेकरिता बँकेचे पॅनेलवरील आर्कीटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांचेकडून मागविण्यांत आलेले एस्टीमेट रु.१३८३५३/- चे प्राप्त झाले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन सावनेर खरेदी विक्री सहकारी संस्थेचे बडेगांव येथील इमारतीत बडेगांव शाखा शिफ्ट करणेसाठी सिव्हील, फर्निशिंग व इलेक्ट्रीकची कामे करवून घेणेकरिता श्री. चिंचमलातपूरे आर्कीटेक्ट यांनी खालीलप्रमाणे सादर केलेले अंदाजपत्रक मंजूर करण्यांत येत आहे.

१. एकूण सिव्हील, फर्निशिंग व इले. कामाचे एस्टीमेट -- रु.१३२७७६.३०
२. आर्कीटेक्ट फी ४% - - - - - - - - - - - - - - - - रु. ५३११.०५
३. आर्कीटेक्ट फी वरील ५% सर्व्हिस टॅक्स - - - - - - - रु. २६५.५५

एकूण रु.१३८३५२.९०

पूर्ण रुपयांत १३८३५२.००

वरील प्रमाणे बॅंकेने संपूर्ण खर्च करावा व सावनेर ख.वि.सह. संस्थेला बडेगांव शाखेच्या किराया देतांना सिव्हील व इलेक्ट्रीकल कामावर वरील प्रमाणे झालेल्या खर्चाची रक्कम कापून घेण्यात यावी असेही ठरले.

ठराव सवनुमते मंजूर

---

विषय क्रमांक ५(४) - बॅंकेची गाडी एम.एच.३१ एम ३२५० विकून नविन गाडी घेणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५(४) - मा० अध्यक्ष यांनी सांगितले की, बॅंकेचे शाखांमध्ये कॅशची ने-आण करणेकरिता बॅंकेनी दिनांक २७.४.१९९८ ला एम एच ३१ एम ३२५० ही कॅश व्हॅन खरेदी केली होती. या गाडीचे स्पेअरपार्ट व दुरुस्तीवर होणारा खर्च दिवसेंदिवस वाढत चालला असून, ही गाडी जानेवारी २००९ अखेर २४३००० कि.मी. फिरलेली आहे. ही कॅश व्हॅन विकून त्या जागी नविन गाडी खरेदी करावी असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन गाडी क्र. एमएच ३१ एम ३२५० ह्या गाडीवर दिवसेंदिवस स्पेअरपार्टस् व दुरुस्ती खर्चात वाढ होत असल्याने ही कॅश व्हॅन विकण्यात यावी. व बॅंकेकरिता नविन गाडी खरेदी करण्यात यावी. सदर गाडी विकून नविन गाडी खरेदी करणेकरिता मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे परवानगी मिळणेसाठी प्रस्ताव पाठवून विनंती करण्यात यावी, असे ठरले.

ठराव सवनुमते मंजूर

---

विषय क्रमांक ५(५) - मा. अध्यक्ष यांचे मुंबई येथील प्रवासाचे भत्ता बील मंजूर करणे.

ठराव क्रमांक ५(५) - इकॉनॉमिक्स कॉन्फरन्सला दि. ११.२.२००९ रोजी उपस्थित राहण्यासाठी मुंबई येथे गेल्याचे मा. अध्यक्ष श्री. सुनिल केदार यांनी सादर केलेले रुपये ७५४० चे प्रवास भत्ता बील मंजूर करण्यांत येत आहे.

सूचक - श्री. र. व्यं. निमजे.
अनुमोदक - श्री. ना. र. ठोंभकाटे.

<u>ठराव सवनुमते मंजूर</u>

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेस उपस्थितांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(सही) प्रभारी व्यवस्थापक
(सही) अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक मर्यादित, नागपूर.

बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा शनिवार दिनांक २८.३.२००१ रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेचे अध्यक्ष मा.श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

-उपस्थित-

| | |
|---|---|
| १. मा.श्री सुनील केदार | अध्यक्ष |
| २. मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. मा. श्री. सं. लि. थोरे | सदस्य |
| ४. मा. श्री. मा. र. अग्निकाटे | ,, |
| ५. मा. श्री. वि. वि. निमजे | ,, |
| ६. मा. श्री. र. व्यं. निमजे | ,, |
| ७. मा. श्री. ब. भा. तायवाडे | ,, |
| ८. मा. श्री. मु. भि. पन्नासे | ,, |
| ९. मा. श्री. चं. तु. समर्थ | ,, |
| १०. मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

-अनुपस्थित-

| | |
|---|---|
| १. मा. श्री. अ. रा. गुप्ता | सदस्य |
| २. मा. श्री. वि. रा. हुलके | " |

३. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर
४. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (बँक), नागपूर
५. मा. विभागीय अधिकारी, महा. राज्य. सह. बँक, विभागीय कार्यालय नागपूर

श्री. अ. रा. गुप्ता व श्री. वि. रा. हुलके सदस्य सभेला अनुपस्थित असल्याबाबत सभेत नोंद घेण्यात आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

सभेला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून मा. अध्यक्ष यांनी या वर्षी बँकेचे सभासदांना २०% लाभांश वितरणाबाबत आपले विचार व्यक्त केले. याकरिता बँकेचे उपविधीत दुरुस्ती करायची आहे. आणि ही दुरुस्ती सहकार खात्याकडून मंजूर करवून घेणेकरिता बँकेचे साधारण सभेत निर्णय होणे आवश्यक आहे. तसेच बँकेला संलग्न सहकारी संस्थांना व्याज सबसिडी, अनिष्ट तफावती इत्यादिसाठी बँकेत कापस फंड निर्माण करायचा आहे असे विचार व्यक्त करून मा. अध्यक्ष यांनी विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कामकाजास सुरुवात केली.

विषयक्रमांक १ – मागिल सभा दिनांक २८.२.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होवुन मागिल सभा दिनांक २८.२.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २ – मागिल सभेत पारित झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहिची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागिल दिनांक २८.२.२००१ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावानुसार केलेल्या कार्यवाहिची थोडक्यांत माहिती मा. सरव्यवस्थापक यांनी सभेला दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहिबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ – बँकेच्या माहे फेब्रुवारी २००१ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर – सविस्तर चर्चा होवुन माहे फेब्रुवारी २००१ मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

---

विषय क्रमांक ४ – बँकेच्या २८ फेब्रुवारी २००१ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा. सरव्यवस्थापक यांनी बँकेच्या २८ फेब्रुवारी २००१ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल जींदगीच्या परिस्थितीची सभेला माहिती दिली. विषयावर सविस्तर चर्चा होवुन बँकेच्या २८ फेब्रुवारी २००१ चे – ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल जींदगीच्या परिस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ५ – बँकेच्या शाखा बडेगांव येथिल किरायाचे नविन इमारतीत फर्निशिंग, रिपेअरींग व इलेक्ट्रीफिकेशन बाबतचे कोटेशन मंजूर करणे.

ठराव क्रमांक ५ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या बडेगांव शाखेकरिता सावनेर खरेदी विक्री सहकारी सोसा. ची बडेगांव येथिल इमारत किरायाने घेण्यांत आलि आहे. या इमारतीत फर्निशिंग, सिव्हील वर्क, इलेक्ट्रीफिकेशनची

काम करवून घेणेकरिता रुपये १३२७६६.३० (अक्षरी रुपये एक लाख बत्तीस हजार सातशे छ्याहत्तर पैसे तीस) चे मंजूर झालेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे खालील तीन कंत्राटदाराकडून कोटेशन प्राप्त झाले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदार | सिव्हील वर्क, इलेक्ट्रीफिकेशन व फर्निशिंग कामाकरिता देवू केलेली रक्कम रुपयांत. |
|---|---|---|
| १. | मे. सौदामिनी बिल्डर्स, नागपूर | १४२१६६.०० |
| २. | मे. यशोधरा असोशिएटस, नागपूर | १३२२६१.०० |
| ३. | मे. गितांजली डेकोरेटर्स, नागपूर | १४६०३९.०० |

विषयावर सविस्तर चर्चा होउन सर्वात कमी दर असलेले मे. यशोधरा असोशिएटस, नागपूर यांचे रुपये १३२२६१.००चे (सिव्हीलकाम रुपये ४८०११.००, फर्निशिंग काम रुपये ७१२५०.०० व इलेक्ट्रीफिकेशन रु. १३०००.००) कोटेशन मंजूर करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६ – बँकेच्या नियोजीत हुडकेश्वर शाखेकरिता किरायाने घेतलेल्या इमारतीचे ठरविण्यांत आलेल्या किरायाा संदर्भात व इतर माहिती देणे.

ठराव क्रमांक ६ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेची नियोजीत शाखा हुडकेश्वर उघडणेकरिता श्रीमती रेखा क्रिष्णराव ढोक यांचे मालकीची १६६० चौरस फुट जागा रुपये ४०००/- प्रतिमाह किरायाने घेतली आहे. बँकेला किरायाचे इमारतीत सोयीनुसार सिव्हील काम करवून घेणेकरिता घरमालकास बिनव्याजी रुपये दोन लाख फक्त अग्रिम ४ हप्त्यांत देण्यांत येणार आहे. आणि या बिनव्याजी अग्रिमची वसुली किराया सुरु झाल्याचे प्रथम महिन्यापासून ५० महिन्यांत मासिक किरायाचे रकमेतून रुपये ४०००/- (अक्षरी रुपये चार हजार फक्त) प्रमाणे वसुल करुन घ्यायचे असून वसुली झाल्यानंतर (५० महिन्यानंतर) दरवर्षी ५% किरायात वाढ करायची आहे. विद्युत मिटर घरमालक बसवून देईल. व इलेक्ट्रिक बिलाचा भरणा बँक करेल. पाण्याचे मीटर घरमालक बसवणार असून पाण्याचे बीलाचा भरणा देखील घरमालक स्वत: करणार आहे. भविष्यांत कार्पोरेशन टॅक्स लागू झाल्यास दोन्ही पार्टी एकत्र बसून टॅक्सचा भरणा कसा करावा याबाबतचा निर्णय घेतील. घरमालकांनी सिव्हीलची संपूर्ण कामे पूर्ण करुन दिल्यानंतर व इमारतीचा रितसर ताबा दिल्यानंतरच मासिक किराया अदा करण्यांत येईल. घरमालकाशी २५ वर्षाचा करारनामा करुन घेण्यांत आला आहे. सिव्हीलचे काम पूर्ण करण्यास घरमालकास रुपये २.०० लाख (अक्षरी रुपये दोन लाख फक्त) बीन व्याजी अग्रिम चार

हप्त्यांत द्यावयाच्या असल्याने त्यापैकी रुपये एक लाख अग्रिम समान दोन हप्त्यांत अदा करण्यांत आला आहे. विषयानुषंगाने सभेला देण्यांत आलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

विषय क्रमांक ७ - बँकेच्या नियोजीत हुडकेश्वर शाखेचे किरायाचे इमारतीत फर्निशिंग, रिपेअरींग, इलेक्ट्रीफिकेशन इत्यादी कामाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ७ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या नियोजित हुडकेश्वर शाखेकरिता सौ. रेखा क्रिष्णराव ढोक यांची जागा किरायाने घेतली आहे. सदर जागेमध्ये घर मालक सिव्हील कामे बँकेचे सोयीप्रमाणे करुन देणार आहे. फर्निशिंग व इलेक्ट्रीफिकेशन कामे बँकेनी करावयाची असून बँकेचे पॅनेलवरील आर्कीटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांचेकडून काउंटर व इलेक्ट्रीक कामाचे एस्टीमेट रुपये १४४९४२.२०, त्यावरील आर्कीटेक्ट फी ४% प्रमाणे रुपये ५७९७.६९ व आर्कीटेक्ट फीवरील सर्व्हिस टॅक्स रुपये २८९.८८चे सादर केले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन नियोजीत हुडकेश्वर शाखेचे फर्निचर व इलेक्ट्रीफिकेशनचे कामांकरिता श्री चिंचमलातपूरे यांनी खालीलप्रमाणे सादर केलेले अंदाजपत्रक सर्वानुमते मंजूर करण्यांत आले.

| | | |
|---|---|---|
| १. एकूण काउंटर व इलेक्ट्रीक कामाचे एस्टीमेट | रु. | १४४९४२.२० |
| २. आर्कीटेक्ट फी ४% प्रमाणे | रु. | ५७९७.६९ |
| ३. आर्कीटेक्ट फी वरील सर्व्हिस टॅक्स ५% प्रमाणे | रु. | २८९.८८ |
| एकूण | रु. | १५१०२९.७७ |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ८ - मा० अध्यक्ष यांचे परवानगीने येणारे विषयावर चर्चा करणे

विषय क्रमांक ८(१) - श्री पी.टी. पाटील भुतपूर्व शाखा व्यवस्थापक (सेवेतून कमी) थडिपवनी व किशोर नथुजी बोंबले यांचे विरुध्द कलम ९१ अंतर्गत मा० सहकार न्यायालयांत वसुलीसाठी दावा दाखल करण्याबाबत.

ठराव क्रमांक ८(१) - मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेनी श्री पी.टी. पाटील यांना सांचेवरील आरोपपत्राप्रमाणे केलेल्या खाते चौकशीत दोषी आढळल्यामुळे दिनांक १५.१२.९९पासून त्यांना कामावरून कमी केले आहे.

बँकेत श्री. पी. टी. पाटील शाखा व्यवस्थापक म्हणून धडिवनी शाखेत कार्यरत असतांना त्यांचे कार्यालयातील व्यवहाराची बँकेनी केलेल्या तपासणीत त्यांनी धडिवनी शाखेत रुपये ३.०० लाखाची (अक्षरी रुपये तीन लाख) अफरातफर केल्याचे आढळले. त्याचप्रमाणे त्यांनी दिनांक ६.८.९८ ला श्री किशोर नत्थुजी बोंबले यांचे खात्यांत खतावणी न करता रुपये १.०० लाखाचा (अक्षरी रुपये एक लाख) विड्राल दिल्याचे आढळले. मुख्य कार्यालयाकडून त्याबाबत विशेष लेखा परिक्षकाच्या रिपोर्ट मागविण्यांत आला. मा० विशेष लेखा परिक्षकाकडून दिनांक २०.३.२००१ ला अहवाल प्राप्त झाला असून त्यात त्यांनी श्री पाटील यांनी धडिवनी शाखेत असतांना कायेल शाखेतून उचल केलेल्या रकमेपैकी रुपये ३.०० लाख (अक्षरी रुपये तीन लाख) धडिवनी शाखेत कमी जमा करुन परस्पर सदर रकमेचा अपहार केल्याचे नमुद केले आहे. तसेच श्री किशोर नत्थुजी बोंबले त्यांचे बचत ठेव खाते क्रमांक ४२६७ मध्ये रुपये १.०० लाख (अक्षरी रुपये एक लाख) खात्यांत न खतावता विड्राल मिळाल्याचे कळविले आहे. त्यामुळे एकंदर रुपये ४.०० लाखाचे (रुपये चार लाखाचे) अफरातफरी साठी श्री. पी. टी. पाटील हे वैयक्तिक रित्या जबाबदार असल्याचे म्हटले आहे. बचत ठेव वैयक्तिक खात्यातून श्री बोंबले यांनी रुपये १.०० लाखाची (अक्षरी रुपये एक लाख) उचल केल्यामुळे ते देखील रुपये १.०० लाख (अक्षरी रुपये एक लाख) ची उचल केल्यामुळे ते देखील रुपये १.०० लाख (अक्षरी रुपये एक लाख) ची भरणा करण्यास संयुक्तिक जबाबदार असल्यामुळे श्री. पी. टी. पाटील व श्री किशोर नत्थुजी बोंबले यांचे विरुध्द वसुलीसाठी मा० सहकार न्यायालयांत कलम ९१ अंतर्गत दावा दाखल करण्यात यावा तसेच श्री. पी. टी. पाटील यांचेविरुध्द फौजदारी तक्रारही करावी लागेल असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ८(२) – बँकेचे सभासदत्व मिळणेकरिता आलेल्या सहकारी संस्थांचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ८(२) – मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, श्रीकृष्ण पत सहकारी संस्था मर्या. नागपूर यांचा बँकेचे सभासदत्व मिळणे म्हणून आवश्यक कागदपत्रासह केलेला अर्ज बँकेस प्राप्त

झाला आहे. बँकेचे तपासणी विभागामार्फत सदर संस्थेची तपासणी घेण्यांत आली असतां संस्थेची नोंदनी दिनांक ११.१.९८ रोजी झालिअसून नोंदनी क्रमांक ४७७ आहे. संस्थेचे बचत खेरवाते महाल शाखेत आहे. संस्था कार्यरत असल्याचे तपासणीत आढळून आले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन श्रीकृष्ण पत सहकारी संस्था म. नागपूर, जुनी मंगळवारी, वार्ड नं. 32 नविन वार्ड ५६, महीपूरा रोड – नागपूर-८ ह्या संस्थेला बँकेचे सभासदत्व देण्याचे मान्य करण्यांत आले. याकरिता संस्थेला आवश्यक सभासद फी व प्रवेश फी बँकेत जमा करण्यास संस्थेला कळविण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर सभेसमोर कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक — अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमि; नागपूर.

(1)

बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा शनिवार दिनांक २८.४.२००९ रोजी दुपारी ४.०० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. | मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा. श्री. आ. चं. शहाणे | सदस्य |
| ४. | मा. श्री. व. भा. वांढे | " |
| ५. | मा. श्री. अ. य. गुजर | " |
| ६. | मा. श्री. श्या. ग. धवड | " |
| ७. | मा. श्री. ग. के. शाहीर | " |
| ८. | मा. श्री. व. क. पाराशिवनीकर | " |
| ९. | मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| १०. | मा. सौ. स्मिताताई कुंभारे | सदस्या |
| ११. | मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

अनुपस्थित

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. मु. भि. पन्नासे | सदस्य |
| २. | मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर | |
| ३. | मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सह. संस्था (बँक), नागपूर. | |
| ४. | मा. विभागीय अधिकारी, म.रा.स. बँक म. विभागीय कार्यालय, नागपूर. | |

श्री मु. भि. पन्नासे सदस्य यांची सभेला अनुपस्थित असल्याबद्दल सभेत नोंद घेण्यांत आली. व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

सभेला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून मा. अध्यक्ष यांनी विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरूवात केली.

विषय क्रमांक १ – मागील दिनांक २४.३.२००९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक २४.३.२००९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक २ - मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहिची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक २८.३.२००१ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावानुसार केलेल्या कार्यवाहिची थोडक्यांत माहिती मा. सरव्यवस्थापक यांनी सभेला दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ - बँकेच्या माहे मार्च २००१ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. माहे मार्च २००१ मध्ये झालेल्या खर्चाबाबत मा. सरव्यवस्थापक यांनी सभेला सविस्तर माहिती दिली. विषयावर चर्चा होऊन माहे मार्च २००१ मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ४ - बँकेच्या ३० मार्च २००१ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. ३० मार्च २००१ चे ताळेबंद पत्रकाची सभेला माहिति देतांना व्यवस्थापन खर्च २.०४% व प्राफीट ऑफ मार्जीन ३.५% असल्याचे सांगून बँकेला ४ शाखा (नविन) उघडण्याकरिता मंजूरी मिळाली असल्याचे सांगितले. मा. सरव्यवस्थापक यांनी बँकेच्या ३० मार्च २००१ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल जींदगीच्या परिस्थितीची सभेला सविस्तर माहिती दिली.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या ३० मार्च २००१ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल जींदगीच्या परिस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ५ - मेटपांजरा येथे बँकेची स्वमालकीची इमारत बांधणेकरिता सादर केलेले अंदाजपत्रक मंजूर करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेची मेटपांजरा येथे असलेली शाखा किरायाचे इमारतीत आहे. किरायाची इमारत शाखेकरिता अपूरी व अडचणीची असून व प्रशस्त वाव नसल्याने बँकेने मेटपांजरा येथे नागपूर काटोल

रोडवर श्री अवकरी यांचे लेआऊटमधिल प्लॉट क्रमांक ७ रुपये १०/- प्रति चौरस फुट दराने रुपये ५६५००/- किंमतीला ५६५० चौरस फुट जागा विकत घेण्यांत आली. सदर जागेवर शाखेची इमारत बांधणेकरिता बँकेच्या पॅनेलवरील आर्कीटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांचेकडून अंदाजपत्रक मागविण्यांत आले त्यांनी इमारत बांधकाम, इलेक्ट्रीक फिटींग, सॅनेटरी फिटींग, फर्निशिंग, कंपाऊंड वाल इत्यादि कामाचे अंदाजपत्रक आर्कीटेक्ट फी व त्यावरील सर्विस टॅक्स सह सादर केले आहे.

१. एकुण कामाचे अंदाजपत्रक ....... रुपये ७८५०२८.९५
२. आर्कीटेक्ट फी ४% प्रमाणे रुपये २९८०१.००
३. आर्कीटेक्ट फी वरील सर्वीस टॅक्स ५% प्रमाणे रुपये १४९०.०५
टोकूण रुपये ७८६३९६.००

विषयावर सविस्तर चर्चा घेवुन मेथ्यांजरा येथे बँकेची स्वमालकीची शाखेकरिता इमारत बांधणेसाठी बँकेचे पॅनेलवरील आर्कीटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांनी आर्कीटेक्ट फी व त्यावरील सर्वीस टॅक्स सह सादर केलेले अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

१. एकुण कामाचे अंदाजपत्रक रुपये ७८५०२८.९५
२. आर्कीटेक्ट फी ४% प्रमाणे रुपये २९८०१.००
३. आर्कीटेक्ट फी वरील सर्वीस टॅक्स ५% प्रमाणे रुपये १४९०.०५
टोकूण रुपये ७८६३९६.००

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ – भिवापूर येथे बँकेची स्वमालकीची इमारत बांधण्याकरिता प्राप्त झालेले अंदाजपत्रक मंजूर करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६ – मा० अध्यक्षांनी विषयाचे वाचन केले व खालील माहिती देतांना सांगितले की, भिवापूर तालुक्याचे ठिकाणी बँकेची शाखा किरायाचे इमारतीत आहे. सदर जागा अपूरी पडत असल्याने तहसिलीच्या ठिकाणी असलेल्या शाखेची इमारत बांधणेकरिता बँकेनी भिवापूर येथे नागपूर - नागभीड रोडवरील कृषि उत्पन्न बाजार समिती भिवापूरची १०८५० चौरस फुट जागा रुपये ४०/- प्रति चौरस फुट दराने रुपये ४३४६००/- ला ५० वर्षांनी लिजवर खरेदी केली आहे. सहाय्यक निबंधक भिवापूर व सुपरविजन सोसा.ची मागणी विचारांत घेवुन त्यांना जागा उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने, त्याचप्रमाणे बँकेच्या तालुकास्तरावर होणाऱ्या सभांकरिता मोठा हॉल व जागेच्या उपलब्धते प्रमाणे कांही शॉपस इत्यादिचे बांधकाम करावे असा मानस असल्याने त्यानुसार बँकेचे पॅनेलवरील आर्कीटेक्ट कडून

अंदाजपत्रक मागविण्यांत आले आहे. खालीलप्रमाणे सादर केलेल्या अंदाज पत्रकांत कंपौंडवाल, सॅनीटरी व फ्लोअरींग, इलेक्ट्रिफिकेशन फर्निशिंग, नळाचे काम इत्यादि कामाच्या समावेश आहे.

१. एकूण कामाचे अंदाजपत्रक रुपये ४३३८६३२.८९
२ आर्कीटेक्ट फी ४% प्रमाणे रुपये १७३५४५.३१
3. आर्कीटेक्ट फी वरील सर्व्हीसटॅक्स ५% प्रमाणे रुपये ८६७७.२७

एकूण रुपये ४५२०८५५.३७

विषयावर सविस्तर चर्चा होउन भिवापूर येथे बँकेचे शाखेसाठी स्वमालकीची इमारत बांधणेकरिता बँकेचे पॅनेलवरील आर्कीटेक्ट यांनी सादर केलेले अंदाजपत्रक रुपये ४३३८६३२.८९, त्यावरील ४% प्रमाणे आर्कीटेक्ट फी रुपये १७३५४५-३१ व आर्कीटेक्ट फीवरील सर्व्हीस टॅक्स ५% प्रमाणे रुपये ८६७७-२७ सर्वानुमते मान्य करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ७ — मा० अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विष. क्रमांक ७(१)- बेला येथे बँकेची स्वमालकीची इमारत बांधणेकरिता सादर केलेले अंदाजपत्रक मंजुर करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७(१) — मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगीतले की, बेला येथे ग्रामपंचायत बेला यांचेकडून खरेदी केलेल्या जागेवर शाखेची इमारत बांधणेसाठी बँकेचे पॅनेलवरील आर्कीटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांचे कडून अंदाजपत्रक मागविण्यांत आले आहे. श्री चिंचमलातपूरे यांनी इमारत बांधकाम, इलेक्ट्रीक फिटींग, सॅनीटरी वर्क, फर्निशिंग, कंपौंडवाल इत्यादि कामाचे अंदाजपत्रक सादर केले आहे.

१. एकूण कामाचे अंदाजपत्रक रुपये ९३९४७६२.४९
२. आर्कीटेक्ट फी ४% प्रमाणे रुपये ५५७९०.५०
3. आर्कीटेक्ट फी वरील सर्व्हीसटॅक्स ५% प्रमाणे रुपये २७८९.५२

एकूण रुपये ९४५३३४२.५१

विषयावर सविस्तर चर्चा होउन बेला येथे बँकेची स्वमालकीची शाखेसाठी इमारत बांधकाम करणेकरिता आर्कीटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांनी सादर केलेले अंदाजपत्रक रुपये — ९३९४७६२.४९ त्यावरील आर्कीटेक्ट फी ४% प्रमाणे रु.५५७९०.५०

व आर्किटेक्ट फी वरील सर्व्हिस टॅक्स ५% प्रमाणे रुपये २७८९=५२ असा एकूण खर्च रुपये १४५३३४२.५१ सर्वानुमते मान्य करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजुर

---

विषय क्रमांक ७(२) – श्री ए. गंगाधरन गोपालन उमरेड यांचे सत्यम शिवम सुंदरम सभागृह, लॉन व रेस्टॉरेंटकरिता मंजुर केलेल्या कर्ज वसुलीबाबत.

ठराव क्रमांक ७(२) – मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, उमरेड येथे सत्यम शिवम सुंदरम सभागृह लॉन व रेस्टॉरेंट बांधणेकरिता श्री ए. गंगाधरन गोपालन उमरेड यांना रुपये ५०.०० लाख मुदती कर्ज मंजुर केले आहे. या मंजुर कर्जापैकी त्यांचेकडे रुपये ४६.५७ लाख कर्जबाकी आहे. दिनांक ३१ मार्च २००० ला प्रथम कर्ज हप्ता रु.१.१६ लाख देय झाला आहे. ३१ मार्च २००१ पर्यंतचे कर्जावरील व्याज रुपये ६४८७४५/- थकित झाले आहे. अशी एकूण रुपये ६४४७४५/- व्याज व कर्जाचा हप्ता थकलेला आहे.

थकित व्याजापोटी सभासदाने दिनांक ३१.१२.२००० ला रुपये २.१२ लाखाचा चेक दिला होता. परंतु सदर चेक अनादर झाल्याने सभासदावर उमरेड येथील दिवानी न्यायालयांत प्रकरण दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. दिनांक ३१ मार्च २००१ पर्यंतचे थकित व्याज व कर्ज रक्कम रुपये ६४८७४५/-चा भरणा ३ दिवसांचे आंत करण्यासाठी बँकेने दिनांक १९ एप्रिल २००१ चे पत्रान्वये लेखी सुचना दिली असतां सभासदाने रुपये ६०,०००/- बँकेचे उमरेड शाखेत जमा केल्याचे दिनांक १८ एप्रिल २००१ चे पत्रान्वये कळवून मे २००१ अखेर पर्यंत काही रक्कम जमा करण्याचे कबुल केले आहे. परंतु उमरेड शाखेत माहिती घेतली असतां श्री ए. गंगाधरन गोपालन यांनी कोणतीच रक्कम जमा केली नाही. यावरुन सभासद कर्ज वसुली देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे श्री ए गंगाधरन गोपालन यांचेवर कर्ज वसुलीसाठी कायदेशिर कारवाई करावी असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री ए. गंगाधरन गोपालन, उमरेड, सत्यम शिवम सुंदरम सभागृह, लॉन व रेस्टॉरेंटचे प्रोप्रायटर हे कर्जवसुली भरणेसाठी टाळाटाळ करीत असल्यामुळे कर्ज वसुलीसाठी त्यांचे विरुद्ध कायदेशिर कारवाई करण्यांत यावी व त्यांना कायदेशिर नोटीस देण्यांत यावी यासाठी कलम ९१ अंतर्गत वसुलीसाठी दावा दाखल करण्याचे दृष्टीने

आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार प्र. व्यवस्थापक यांना देण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटीव्ह बँक लिमि. नागपूर.

बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा सोमवार दिनांक २८.५.२००७ रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत" बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आलि. या सभेला खालिल मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित.

१. मा. श्री. सुनिल केदार अध्यक्ष
२. मा. सौ. आशाताई महाजन उपाध्यक्षा
३. मा. श्री. श्रा. वं. श्रहाणे सदस्य
४. मा. श्री. व. श्रा. वांढे "
५. मा. श्री. अ. य. गुजर "
६. मा. श्री. शा. ग. धिवड "
७. मा. श्री. ग. के. शाहीर "
८. मा. श्री. चं. तु. समर्थ "
९. मा. सौ. ललिताताई कुंभारे सदस्या.
१०. मा. श्री. असवार, विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक) नागपूर.
११. मा. श्री. एस. एस. गोंडे प्रभारी व्यवस्थापक

- अनुपस्थित -

१. मा. श्री. मु. भि. पन्नासे सदस्य
२. मा. श्री. व. क. पारशिवनिकर "
३. मा. जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर.
४. मा. विभागीय अधिकारी, म. रा. सह. बँक म. विभागीय कार्यालय, नागपूर.
५. मा. श्री. एन. एन. चौधरी, सरव्यवस्थापक.

---

सभेला सुरूवात होण्यापूर्वी श्री. व. क. पारशिवनिकर व श्री. मु. भि. पन्नासे, संचालक सभेला अनुपस्थित असल्याने सभेत नोंद घेऊन त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली. बँकेचे सरव्यवस्थापक श्री. एन. एन. चौधरी, प्रशिक्षणासाठी गेल्याने सभेला उपस्थित नाहीत.

सभेला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून मा. अध्यक्ष यांनी विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरूवात केली.

विषय क्रमांक १ - मागिल दिनांक २८.४.२००७ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा करतांना मा. श्री. ग. के. शाहीर यांनी मेट्यांजरा, भिवापूर, बेला येथे

बांधण्यात येणाऱ्या इमारत बांधकामाचे क्षेत्रफळ किती? तसेच या बांधकामाकरिता प्रति चौरस फुट किती खर्च येणार? याबाबत माहिती विचारली असता मा. श्री. एस. एस. गोडे प्रभारी व्यवस्थापक यांनी सभेला माहिती दिली. यावर मा. अध्यक्ष म्हणाले की, यापुढे बांधकामाबाबतचे अंदाजपत्रक सभेपुढे सादर करतांना बांधण्यांत येणाऱ्या इमारत बांधकामाचे क्षेत्रफळ किती? व बांधकामाच्या प्रति चौरस फुट खर्च किती? याबाबत माहिती देण्यांत यावी.

विषयावर सविस्तर चर्चा होउन मागिल दिनांक २८.४.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २ – मागिल सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागिल दिनांक २८.४.२००१ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची बँकेचे प्रभारी व्यवस्थापक श्री. एस. एस. गोडे यांनी थोडक्यांत माहिती सभेला दिली. केलेल्या कार्यवाहीबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक 3 – बँकेच्या माहे एप्रिल २००१ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक 3 – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. माहे एप्रिल २००१ मध्ये झालेल्या खर्चाबाबत बँकेचे प्रभारी व्यवस्थापक यांनी सभेला माहिती दिली. विषयावर सविस्तर चर्चा होउन माहे एप्रिल २००१ मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

---

यानंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने झालेल्या चर्चेत मा. श्री. बी. व्ही. असवार, विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (बँक) नागपूर यांनी वीज बिलाच्या बील कलेक्शनची सध्याची पध्दती डिफेक्टीव असल्याचे सांगितले यावर मा० अध्यक्ष म्हणाले की, मह. राज्य विज मंडळाचे वीज बिलाचे बील कलेक्शनची पध्दती डिफेक्टीव वाटत असल्यामुळे वीज बील भरणा घेण्याची जी जूनी पध्दती होती तीच पध्दती योग्य आहे असे वाटते.

यानंतर श्री एस. एस. गोडे, प्रभारी व्यवस्थापक यांनी

शाखांच्या वर्गवारीबाबत सभेला माहिती दिली. यावर मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, शाखांच्या या वर्गवारीनुसार स्टाफींग पॅटर्न येणाऱ्या बोर्डात ठेवून मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठवून मंजूरी प्राप्त करायची आहे. साधारणत: नविन माणसाला प्रशिक्षित होण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी लागतो हे विचारात घेऊन पुढील दोन वर्षात सेवानिवृत्त होणारे कर्मचारी विचारात घेऊन स्टॉफींग पॅटर्न तयार करण्यात यावा. शाखांच्या वर्गवारीप्रमाणे शाखा व्यवस्थापकांनी येत्या तीन ते सहा महिन्यांत खालीलप्रमाणे चालु खाते उघडले पाहिजेत.

'अ' वर्ग शाखा -- कमीत कमी ५५ चालु ठेव खाते.
'ब' वर्ग शाखा -- कमीत कमी १९ चालु ठेव खाते
'क' वर्ग शाखा -- कमीत कमी ९ चालु ठेव खाते.

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

प्रभारी व्यवस्थापक — अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लिमी. नागपूर.

बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा शनिवार दिनांक ३० जून २००१ रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर मधिकराव देशपांडे स्मृती सभागृहांत" बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनिल केदार यांचे अध्यक्षते खाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

१. मा. श्री. सुनिल केदार — अध्यक्ष
२. मा. सौ. आशाताई महाजन — उपाध्यक्षा
३. मा. श्री. भा. चं. शहाणे — सदस्य
४. मा. श्री. व. भा. वांढे — ,,
५. मा. श्री. अ. य. गुजर — ,,
६. मा. श्री. श्या. ग. धवड — ,,
७. मा. श्री. ग. के. शाहरे — ,,
८. मा. श्री. व. क. पारशिवनीकर — ,,
९. मा. श्री. चं. तु. समर्थ — ,,
१०. मा. श्री. ए. एन. चौधरी — सरव्यवस्थापक

- अनुपस्थित -

१. मा. श्री. मु. भि. पन्नासे — सदस्य
२. मा. सौ. स्मिताताई कुंभारे — ,,
३. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
४. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (बँक), नागपूर.
५. मा. विभागिय अधिकारी, महा. राज्य सह. बँक मर्या., विभागिय कार्यालय, नागपूर

---

सभेला सुरुवात करण्यापूर्वी सभेचे सभासद श्री. मु. भि. पन्नासे आणि सौ. स्मिताताई कुंभारे यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आलीव त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर सभेला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करुन विषयपत्रिके वरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस मा. अध्यक्ष यांनी सुरुवात केली.

---

विषय क्रमांक १ :- मागील दिनांक २०.५.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे

ठराव क्रमांक १ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले, विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक २०.५.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक २ :- मागिल सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. सभेला माहिती देतांना मा० सरव्यवस्थापक यांनी मागिल दिनांक २८.५.२००१ रोजीचे सभेत झालेल्या निर्णयाप्रमाणे कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत थोडक्यांत सभेला माहिती दिली. मागिल सभेतील ठरावाप्रमाणे कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद सभेत घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ :- बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आलेल्या सहकारी संस्थांचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ३ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, कल्पवृक्ष अर्बन क्रेडीट सोसायटी मर्या. गांधीबाग, नागपूर या संस्थेने बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आवश्यक कागदपत्रासह बँकेकडे अर्ज सादर केला आहे. संस्थेचे कार्यालय गांधीबाग, हँडलुम मार्केटमध्ये रुम क्रमांक १४८ मध्ये आहे. संस्थेचे चालु ठेव खाते क्रमांक १०५ असून हे खाते गांधीबाग शाखेत सुरु आहे. संस्था कार्यरत आहे.

विषयावर चर्चा करतांना श्री पाराशिवनीकर संचालक म्हणाले की, मागिल ५-१० वर्षात अर्बन क्रेडीट सहकारी संस्थांना कर्ज वाटप करण्यांत आले नाही. या संस्थेला सभासदत्व देऊन बँकेची सभासद संख्या वाढविणे होईल. मा० सरव्यवस्थापक यांनी सदर संस्थेचे कार्यक्षेत्र केवळ वार्ड क्रमांक ३३ पुरतेच मर्यादित असल्याचे सांगितले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कल्पवृक्ष अर्बन क्रेडीट सोसा. मर्या. नागपूर या संस्थेला बँकेचे सभासदत्व देण्याचे तुर्तास थांबवावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ४ :- माहे मे २००१ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ४ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा करतांना श्री. ग. के. शाहिर म्हणाले की, किरकोळ खर्च हा मागिल महिन्यापेक्षा खुपच जास्त झाल्याचे दिसून येते. या खर्चात काय काय आहे? याबाबत सभेला माहिती देण्याची विनंती केली. यावर मा० सरव्यवस्थापक यांनी किरकोळ खर्चात गव्हर्नमेंट गॅरंटी फी या खर्चाचा समावेश असल्याने खर्च वाढल्याचे दिसून येत असल्याचे सांगितले. यावर मा० अध्यक्ष म्हणाले की, गव्हर्नमेंट गॅरंटी फी चे वेगळे हेड तयार करण्यांत यावे. तसेच शाखेचे

शाखांचे टेलिफोन खर्चावर नियंत्रण ठेवण्यांत यावे. व टेलिफोन बीलाच्या खर्च वाढणार नाही याकरिता शाखाव्यवस्थापकांना कळवून टेलिफोन खर्चावर नियंत्रण न ठेवल्यास संबंधित अधिकाऱ्यांचे/कर्मचाऱ्यांचे पगारातून टेलिफोन बीलावरील खर्चाची रक्कम वसुल करण्यांत येईल असे कळवावे. टेलिफोन रजिस्टर ठेवून त्यामध्ये टेलिफोन करणाऱ्यांच्या नांवाने नोंदी घेण्यात याव्या. व टेलिफोन करणे बाबत शिस्त लावण्यात यावी. यानंतर श्री शहाणे संचालक म्हणाले की, स्टेटमेंट मध्ये किरकोळ खरेदी, किरकोळ खर्च व किरकोळ दुरुस्ती असे तीन किरकोळचे हेड अंतर्गत खर्च दाखविण्यांत आला आहे त्यापेक्षा किरकोळ खरेदी किरकोळ खर्च व किरकोळ दुरुस्तीचे एकच हेड असावे. व या खर्चाची वेगवेगळी माहिती ठेवण्यांत यावी. यावर चर्चा होऊन किरकोळ खर्च व किरकोळ खरेदी ह्या दोन हेडखालील खर्च किरकोळ खर्चाच्या एकाच हेडखाली घेण्याबाबत सभेचे मत पडले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन माहे मे २००७ मध्ये आलेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ५ :- बँकेचे माहे २७ एप्रील २००७ व २५ मे २००७ चे ताळेबंद पत्रक तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल्या औंदगत्त्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ५ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा० सरव्यवस्थापक यांनी बँकेचे २७ एप्रिल २००७ व २५ मे २००७ चे ताळेबंद पत्रक तसेच बँकेने राखलेल्या रोख निधीची व तरल्या औंदगत्त्या परिस्थितीबाबत सभेला माहिती दिली. मा० सरव्यवस्थापक यांनी ताळेबंद पत्रक व राखलेल्या रोख निधी व तरल्या औंदगत्त्या परिस्थितीबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ६ :- बँकेत सेक्युरिटी गार्ड ठेवणेबाबत करार संपल्याने मागविण्यात आलेल्या कोटेशनवर विचार करणे.

ठराव क्रमांक ६ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या सुरक्षेच्या दृष्टीने सद्यस्थितीत बँकेचे मुख्य-कार्यालय व शहरांतील ९ शाखा तसेच तालुका स्तरावर ८ शाखांमध्ये मेसर्स नोएल सेक्युरिटी सर्व्हिस, नागपूर यांचेकडील सुरक्षा गार्ड सेवेत आहेत. या एजंसीचे ३ वर्षे कराराची मुदत दिनांक ३१.१२.२००७ रोजी संपली आहे. बँकेला सुरक्षेच्या दृष्टीने सिक्युरीटी गार्ड ठेवणे आवश्यक

असल्यामुळे सुरक्षा गार्ड पुरविणाऱ्या एजेंसीकडून कोटेशन बोलाविण्यांत आले आहेत. बँकेला खालीलप्रमाणे सात कोटेशन प्राप्त झाले आहे.

| अ.क्र. | सुरक्षा एजेंसीचे नांव | सिक्युरिटि गार्ड (रुपयांत) | | |
|---|---|---|---|---|
| | | शहर. | तालुकाशाखा | गनमॅन |
| १. | नोएल सिक्युरिटि सर्व्हीसि, नागपूर | १५०० | १७०० | २७०० |
| २. | इंडस्ट्रीयल सिक्युरिटी ॲंड फायर सर्व्हीसि बाळे प्राय. लि. नागपूर | २२९५ | -- | ४७६५ |
| ३. | वनश्री इंटेलीजन्स डिटेक्टीव्ह सिक्युरिटी सर्व्हीसि, नागपूर | १६०० | -- | २६०० |
| ४. | नॅशनल्स सिक्युरिटी सर्व्हीसि, नागपूर | १९९५ | -- | ४६२० |
| ५. | सेन्ट्रल डिटेक्टीव्ह ॲंड सिक्युरिटी सर्व्हीस | १६०० | -- | ३५०० |
| ६. | सिंग सिक्युरिटी सर्व्हीसि | २५८७ | -- | -- |
| ७. | ब्रिलीयंट सिक्युरिटी सर्व्हीसि | १६५० | १९५० | ४७५० |
| | | (१५ टक्के सर्व्हीसि चार्ज वेगळा) | (१५ टक्के सर्व्हीसि चार्ज वेगळा) | (१५ टक्के सर्व्हीसि चार्ज वेगळा) |

वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या कोटेशनमध्ये नोएल सिक्युरिटि सर्व्हीसि, नागपूर यांचे सर्वात कमी दराचे कोटेशन आहे. तसेच नोएल सिक्युरिटीसर्व्हीसि, नागपूर यांनी जुन्या दरानुसार सिक्युरिटि गार्ड पुरविण्याबाबत बँकेकडे पत्र पाठवून तयारी दर्शविली आहे. मे. नोएल सिक्युरिटी सर्व्हीसि यांचे सिक्युरिटी गार्डचे जुने दर खालील प्रमाणे आहेत.

१. मुख्य कार्यालय व शहरातील शाखेतील सुरक्षा गार्ड — रु० १२००- दरमहा
२. एक्स सर्व्हीस मॅन — रु. ११०० —"—
३. बंदुकधारी गार्ड (मुख्य कार्यालयाकरिता) — रु. २२०० "
४. तालुका स्तरावरील शाखेतील सुरक्षा गार्ड — रु. १४०० —"—

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेत सुरक्षितेच्या दृष्टीने सुरक्षा गार्ड ठेवण्याकरिता निर्णय घेण्याचे व करारनामा करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७ :- मा० अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ७(१) :- शाखा तारसा किरायाचे नविन इमारतील शिफ्ट करणेबाबत

ठराव क्रमांक ७(१) :- मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, तारसा शाखेच्या इमारतीचे छत जीर्ण झाले आहे. सदर इमारतीचे छत केव्हाही दरणी कोसळेल अशी स्थिती आहे. छताच्या काही भागाचे प्लॅस्टर पडले आहे. त्यामुळे तारसा शाखा दुसऱ्या इमारतीत त्वरित शिफ्ट करणे आवश्यक झाले आहे. याकरिता श्री तुळशिरामजी श्रीराम हटवार यांची इमारत पाहण्यात आली. सदर इमारत बॅंकेच्या सोयीचे दृष्टीने योग्य असल्यामुळे किरायाने घेण्यांत यावी असे वाटते. सदर इमारतीची ८००चौरस फुट जागा रुपये १.५० प्रति चौरस फुट रुपये १२००/-प्रतिमहा प्रमाणे किरायाने देण्याचे घरमालकाने स्विकृती दिली आहे. इलेक्ट्रिक बील बॅंकेने भरावयाचे असून इमारतीचा टॅक्स व पाणी बील इमारत मालक स्वत: भरणार असल्याबाबत स्विकृती दिली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन तारसा शाखेचे कार्यालय श्री. तुळशिराम श्रीराम हटवार यांचे इमारतीत शिफ्ट करण्यांत यावे व श्री.तुळशिराम श्रीराम हटवार यांनी स्विकृती दिल्याप्रमाणे ८०० फुट चौरस फुट जागा रुपये १.५० चौरस फुट प्रमाणे रुपये १२००/- प्रतिमहा किरायाने घेण्याबाबत तसेच इलेक्ट्रिक बिल बॅंकेने भरावयाचे तसेच इमारत टॅक्स व पाणी बील घरमालकाने भरावयाचे याबाबत करारनामा करण्यांत यावा. करारनामा करण्याचे अधिकार बॅंकेचे सरव्यवस्थापक/व्यवस्थापक यांना देण्यांत येत आहे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७(२) :- मुख्य कार्यालयासह शाखांमध्ये सुरु असलेल्या सॉफ्टवेअर संबंधी चर्चा करणे व बॅंकेच्या विकेंद्रीकरणाच्या धोरणासंबंधी सॉफ्टवेअर संबंधी निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ७(२) :- मा० अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करतांना मा.श्री भा.च. शहाणे संचालक म्हणाले की, मागिल दिनांक १६.१०.२००१ रोजीचे मा० व्यवस्थापक समितीचे सभेत मुख्य कार्यालय स्तरावरील संकलनाची कामे तालुका स्तरावर संगणकाद्वारे विकेंद्रीत करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. तरी याबाबत संगणकीकरणाची सद्याची स्थिती काय आहे याबाबत सभेला माहिती देण्याची विनंती केली. यावर मा० अध्यक्ष महोदय यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बॅंकेचे मुख्य कार्यालयासह शहरातील जिल्हा परिषद, रामनगर, हनुमाननगर व हिंगणा या शाखांमध्ये संगणकीकरन झाले असून याकरिता मे० ऑटोसॉफ्ट, पुणे या कंपनीचे सॉफ्टवेअर घेण्यांत आले आहे. सदर सॉफ्टवेअर मध्ये बरेचदा अडचणी आल्यामुळे ऑटोसॉफ्ट कंपनीला अनेकदा कळवून

सुद्धा आलेल्या अडचणी बाबत दुर्लक्ष केल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच या आटोसॉफ्ट कंपनीकडून घेण्यांत आलेल्या सॉफ्टवेअर मधील डेटा बाबत सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होतो आहे यावर मा०श्री. भा.चं. शहाणे संचालक म्हणाले की, आटोसॉफ्ट कंपनीकडून घेण्यांत आलेल्या सॉफ्टवेअर मध्ये येणाऱ्या अडचणी सोडविण्यांत दुर्लक्ष होत असेल तर इतर नामांकित कंपनीकडून सॉफ्टवेअर घेण्यांत यावे. तसेच तालुका स्तरावर संगणकीय विकेंद्रीकरण करावयाचे असल्याने त्यासाठी आवश्यक असणारे हार्डवेअर सुद्धा खरेदी करण्यांत यावे. मा.श्री.भा.चं. शहाणे, संचालक यांचे सुचनेला मा.श्री.व.भा.वांढे, संचालक यांनी दुजोरा दिला.

विषयावर सविस्तर चर्चा होउन ऑटोसॉफ्ट कंपनीकडून घेण्यांत आलेल्या सॉफ्टवेअरचे बाबतीत येणाऱ्या अडचणी सोडविण्यांत होणारे दुर्लक्ष व सुरक्षितता या बाबी विचारांत घेउन नामांकीत सॉफ्टवेअर पुरविणाऱ्या - नामांकित कंपन्याकडून कोटेशन/टेंडर मागविण्यांत यावे असे ठरले. तसेच तालुका स्तरावरील शाखांमध्ये संगणकीकरणाचे काम त्वरित सुरु करावयाचे असल्यामुळे तालुका स्तरावरील व शहरांतील काही निवडक शाखांचे संगणकीकरणासाठी आवश्यक असणारे हार्डवेअर संगणक साहित्य खरेदी करण्यासाठी सुद्धा टेंडर/कोटेशन मागविण्यांत यावे असे ठरले.

संगणकीकरणाचे संदर्भात बँकींग सॉफ्टवेअर व हार्डवेअर करिता प्राप्त झालेल्या टेंडर/कोटेशन्सवर निर्णय घेउन वर्क ऑर्डर देण्याचे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

सुचक :- मा.श्री. भा.चं. शहाणे

अनुमोदक :- मा.श्री. व.भा. वांढे.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७(३) :- विद्या शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर यांचे वतीने मेडीकल कौन्सील ऑफ इंडिया यांना देण्यासाठी राज्य सहकारी बँकेमार्फत प्रस्थापित केलेल्या बँक गॅरंटीच्या मंजूर पत्रातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत.

ठराव क्रमांक ७(३) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना विदीत केले की, विद्या शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर यांचे वतीने मेडीकल कौन्सील ऑफ इंडिया यांना देण्यासाठी रुपये १.०० कोटीची ५ वर्षे मुदतीची बँक गॅरंटी मंजूर केली असून महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि, नागपूर यांनी सदर बँक गॅरंटी प्रस्थापित करुन त्यांचे पत्र क्रमांक सीएफए/ओपीआर/ फा/३७१/२००१-२००२ दिनांक १-६-२००१ नुसार आपणास कळविले आहे. बँक गॅरंटीबाबत राज्य सहकारी बँकेचे प्रचलित नियमानुसार बँक गॅरंटीसबत

राज्य सहकारी बँकेचे प्रचलित नियमानुसार बँक गॅरंटीवर २ टक्के कमिशन व अनुषंगिक खर्च नांवे टाकणेबाबत व चालु ठेव खात्यावर रुपये १.०० कोटी इतकी रक्कम राखून ठेवणेबाबत अधिकार पत्र मागविले आहे व बँकेनी पूर्तता केली आहे. याशिवाय या संदर्भात रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या व राज्य सहकारी बँकेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती बंधनकारक असल्याचे नमुद केले आहे. मंजूर पत्रातील अटी बँकेस मान्य असल्याबाबत ठरावासह राज्य बँकेला कळवायचे आहे.

यावर सभेत चर्चा होवुन राज्य सहकारी बँकेने बँक गॅरंटीबाबतचे मंजूरी पत्र क्रमांक सीएफए/ओपीआर/फा/३०१/२००१-०२/दिनांक १.६.२००[illegible] नुसार कळविलेल्या अटी व शर्ती बँकेला मान्य आहेत.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

यानंतर सभेसमोर कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक — अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि, नागपूर.

३१७/२००१



बँकेच्या मा० व्यवस्थापक समितीची सभा सोमवार दिनांक ३०.६.२००१ रोजी दुपारी १.०० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात बँकेचे अध्यक्ष मा०श्री० सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

१. मा. श्री. सुनिल केदार — अध्यक्ष
२. मा० सौ. आशाताई महाजन — उपाध्यक्षा
३. मा. श्री. श्रा. चं. शहाणे — सदस्य
४. मा. श्री. व. श्रा. वांढे — "
५. मा. श्री. श्या. ग. धिवड — "
६. मा. श्री. ग. के. शाहिर — "
७. मा. श्री. व. क. पारशिवनीकर — "
८. मा. श्री. चं. तु. समर्थ — "
९. मा. सौ. स्मिताताई कुंभारे — सदस्या
१०. मा. श्री. बी. एस. असवार विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक) नागपूर
११. मा. श्री ए. एन. चौधरी — सरव्यवस्थापक

- अनुपस्थित -

१. मा. श्री. अ. य. गुजर. — सदस्य
२. मा. श्री. मु. भि. पन्नासे — "
३. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर
४. मा. विभागीय अधिकारी, म. रा. सह. बँक मर्या, विभागीय कार्यालय, नागपूर.

---

मा. श्री. अ. य. गुजर आणि मा. श्री. मु. भि. पन्नासे, समिती सदस्य सभेला उपस्थित नसल्यामुळे यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर सभेला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करुन सभेचे कार्यवाहीस मा० अध्यक्ष यांनी सुरुवात केली.

विषय क्रमांक १ :— मागील दिनांक ३०. जून २००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक ३० जून २००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक २ :- मागिल सभेत पारित झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. सभेला माहिती देतांना सांगितले की, मा० सरव्यवस्थापक यांनी मागिल दिनांक ३० जून २००१ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत थोडक्यांत माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद सभेत घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ३ :- बँकेच्या माहे जून २००१ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. हिंगणा शाखेचे टेलिफोन खर्च बजेटपेक्षा जास्त वाटत असल्यामुळे हिंगणा शाखेकडून टेलिफोन खर्चाचा खुलासा मागविण्यांत यावा असे ठरले. विषयावर सविस्तर चर्चा होवुन माहे जून २००१ मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ४ :- बँकेच्या दिनांक ३० जून २००१ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल्या जिंदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा० सरव्यवस्थापक यांनी बँकेच्या दिनांक ३० जून २००१ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल्या जिंदगीच्या परिस्थितीची माहिती सभेला दिली. विषयावर चर्चा करतांना मा. श्री. व.क. पारशिवनीकर म्हणाले की, ताळेबंदाला रुपये १.५४ लाख लाभांश द्या शिर्षकाखाली इतर देणी म्हणून दाखविले आहे. दाखविण्यांत आलेली रक्कम कोणत्या वर्षाची देणे आहे याबाबत माहिती देण्यास विनंती केली. मा० अध्यक्ष म्हणाले की, ताळेबंदाला लाभांशबाबत दाखविलेल्या रकमेची वर्षवार माहिती काढून देण्यास सांगितले. तसेच लाभांश देण्याचे जाहिर केल्यानंतर तीन वर्षांचे आंत ज्यांनी लाभांश उचल केला नाही त्यांनी लाभांशची रक्कम एक महिन्याचे आंत घेवुन जावी अन्यथा लाभांश जाहिर केल्याचे तारखेपासून तीन वर्षांचे वरील लाभांशाची रक्कम रिझर्व फंडात जमा करण्यांत येईल अशी वर्तमान पत्रांत जाहिरात देण्यांत यावी.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन दिनांक ३० जून २००१ चे

ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५ :- मा० अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ५(१) :- राष्ट्रीय पिक विमा योजने विरुध्द शेतकऱ्यांचे वतीने मा० उच्च न्यायालयांत केस दाखल करणेबाबत.

ठराव क्रमांक ५(१) :- राष्ट्रीय कृषि पिक विमा योजना ही जिल्हा बँकेमार्फत राबविण्यांत येते. शेतकऱ्यांना सेवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या कर्जा वरील रकमेच्या पिक विमा हप्ता बँकेकडून विमा निगमास पाठविण्यात येतो. तथापि या योजने अंतर्गत दिली जाणारी नुकसान भरपाई ही शेतकऱ्यांचे पिकांचे जे नुकसान झाले त्याप्रमाणांत अगदीच नगण्य स्वरुपाची असते. बँकेने मंडळ स्तरावरील पिक कापनी प्रयोगाचे वेळी बँकेचा प्रतिनिधी घेणेबाबत तसेच नुकसान भरपाई काढण्याचे सुत्र अन्यायक स्वरुपाचे असल्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान होउनही भरपाई मिळू शकत नसल्यामुळे बँकेने मंत्रालय, मुंबई, कृषि आयुक्तालय, पुणे ह्यांचेशी वेळोवेळी पत्रव्यवहार करुन दाद मागण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचेकडून कुठल्याही प्रकारचा समाधानकारक तोडगा निघू शकत नसल्याने तसेच चालू वर्षी संपूर्ण जिल्ह्यांत दुष्काळी परिस्थिती असतांना सुध्दा त्याचा लाभ फक्त कांहीच शेतकऱ्यांना मिळाला असल्यामुळे बँकेनी शेतकऱ्यांच्या व सर्वसाधारण सभासदांच्या हितासाठी विमा कंपनी व सरकार विरुध्द मा० उच्च न्यायालयांत केस दाखल करावी असे सर्वानुमते ठरले. तसेच ह्याबाबत बँकेतर्फे कार्यवाही करण्याचे अधिकार बँकेचे सरव्यवस्थापक/व्यवस्थापक ह्यांना देण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५(२) - बँकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता अपघात विमा पॉलीसी उतरविणे बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५(२) :- मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बँकेचे सेवेत असतांना दुर्दैवाने अपघात होउन निधन झाल्यास त्यांचे वारसदारांना आर्थिक मदत मिळावी याकरिता अपघात विमा पॉलीसी उतरविण्यांत येवून अधिकारी/कर्मचाऱ्यांना संरक्षण प्रदान करण्यांत यावे असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होउन अधिकारी/कर्मचाऱ्यांकरिता अपघात विमा पॉलीसी उतरविण्याची योजना राबविण्यांत यावी. सदर

योजना राबविण्यास मा० संचालक मंडळाची मंजूरी घेण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५(३):- दिनांक २२.७.२००१ रोजी अपघात होवुन जवळी शाखेतील मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना आर्थिक मदत करणेबाबत.

ठराव क्रमांक ५(३) :- मा० अध्यक्ष यांनी असे सांगितले की, दिनांक २१.७.२००१ रोजी जवळी शाखेतील श्री आर० के० रोकडे, शाखा व्यवस्थापक, श्री. बी. एम. झोडे रोखपाल, व श्री पी० बी० शहाणे, चपराशी ह्या तिन्ही कर्मचाऱ्यांचा अपघात होवुन आकस्मिक मृत्यु झाला. ह्या कर्मचाऱ्यांचे वारसदारांना आर्थिक मदत करावी असे वाटते. यावर मा० सरव्यवस्थापक म्हणाले की, सदर मृत कर्मचाऱ्यांचे वारसदारांना आर्थिक मदत द्यायची झाल्यास उपविधी क्रमांक ५७(ई) अंतर्गत "स्पेशल कॉन्टिन्जंसी फंड फॉर वेलफेअर ऑफ एम्प्लॉइज" निर्माण करता येईल. व यातून मदत करता येईल.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन उपविधी क्रमांक ५७(ई) अंतर्गत "स्पेशल कॉन्टिन्जंसी फंड फॉर वेलफेअर ऑफ एम्प्लाइज" निर्माण करण्यांत यावा. व ह्या फंडातील रकमेतून अपघातात निधन पावलेल्या श्री आर. के. रोकडे, श्री. बी. एम. झोडे व श्री पी. बी. शहाणे ह्या तिन्ही कर्मचाऱ्यांचे वारसदारांना आर्थिक मदत देण्यांत यावी. याकरिता मा० संचालक मंडळाची मंजूरी घेण्यात यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५(४) - मा० अध्यक्ष यांचे माहे जुलै २००१ चे प्रवास भत्ता बील मंजूर करणे.

ठराव क्रमांक ५(४) :- बँकेचे मा० सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे अध्यक्ष दिनांक २५.७.२००१ ला मुंबई येथे महाराष्ट्र राज्य संवर्गीकरण सहकारी सोसायटी मर्यादित पुणे या संस्थेचे वार्षिक साधारण सभेस उपस्थित राहिल्याबद्दल माननीय अध्यक्ष श्री. सुनील केदार यांनी जुलै २००१ चे रूपये ७६९०/- (अक्षरी रूपये सात हजार सहाशे नव्वद फक्त) चे प्रवास भत्ता बील सादर केले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन मा० अध्यक्ष श्री सुनील केदार यांनी सादर केलेले जुलै २००१ चे रूपये ७६९०/-

(रुपये सात हजार सहाशे नव्वद फक्त) चे प्रवास बीलास मंजूरी देण्यात येत आहे असे ठरले.

सुचक - श्री. ग. के. शाहिर

अनुमोदक - श्री भा. चे. शहाणे

ठराव सर्वानुमते मंजूर

---

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक

अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक मर्या, नागपूर.

बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा शनिवार दिनांक २५.८.२००१ रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेचे मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात बँकेचे अध्यक्ष मा.श्री.सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. ह्या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित.

| | |
|---|---|
| १. मा.श्री. सुनिल केदार | अध्यक्ष |
| २. मा.सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. मा.श्री. भा.चं. वाहाळे | सदस्य |
| ४. मा.श्री. व.भा. वाढे | " |
| ५. मा.श्री. अ.य. गुजर | " |
| ६. मा.श्री. शा.ग. धवड | " |
| ७. मा.श्री. ग.के. शाहिर | " |
| ८. मा.श्री. व.क. पारशिवनीकर | " |
| ९. मा.श्री. चं.तु. समर्थ | " |
| १०. मा.सौ. स्मिताताई कुंभारे | सदस्या |
| ११ मा.श्री. ए.एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

अनुपस्थित

१. मा.श्री. मु.भि. पन्नासे — सदस्य
२. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
३. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक), नागपूर.
४. मा. विभागीय अधिकारी, महा.राज्य सह.बँक मर्या., विभागीय कार्यालय नागपूर.

सभेला अनुपस्थित असलेले मा.श्री. मु.भि. पन्नासे, सदस्य यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यात आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून मा. अध्यक्ष यांनी सभेचे कामकाजास सुरुवात केली.

विषय क्रमांक १:- मागील दिनांक ३०.७.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर

चर्चा घेवून मागील दिनांक ३०.७.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक २ :- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक ३०.७.२००१ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत सरव्यवस्थापक यांनी थोडक्यांत माहिती सभेला दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद सभेत घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ३ :- बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आलेल्या सहकारी संस्थांचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आलेल्या खालील संस्थांनी आवश्यक कागदपत्रासह बँकेकडे अर्ज सादर केले आहेत. बँकेचे तपासणी विभागामार्फत ह्या संस्थांची तपासणी घेण्यांत आली असून सदर संस्था कार्यरत असल्याचे आढळून आले आहे. सदर दोन्ही संस्था सभासदांकडून ठेवी गोळा करणे व गरजू सभासदांना कर्ज देण्याचा व्यवहार करीत आहेत.

१. धनलक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सह. पत संस्था मर्या. ~~निहारवाणी~~ धानला ता. मौदा

२. शिवम् ग्रामीण बिगर शेती सह. पत संस्था मर्या. निहारवाणी ता. मौदा

विषयावर चर्चा करतांना श्री. व. क. पारशिवनीकर, संचालक म्हणाले की, शिवम् ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था म. निहारवाणी ता. मौदा ह्या संस्थेचे सेव्हींग खाते आपल्या बँकेच्या दोन शाखेत व भंडारा अर्बन को-ऑप. बँकेच्या ठाणा (पेट्रोलपंप) शाखेत असे तीन ठिकाणी असून जास्त शिल्लक भंडारा अर्बन को-ऑप बँकेच्या ठाणा शाखेत दिसत आहे. तथापी ह्या संस्थेला बँकेचे सभासदत्व द्यायचे झाल्यास ह्या संस्थेने आपले बँकेचे एकाच शाखेतून व्यवहार करावा अशी सुचना केली. यावर मा. अध्यक्ष म्हणाले की, ह्या संस्थेने भंडारा अर्बन बँकेतील खाते बंद करून फक्त आपल्याच बँकेतून व्यवहार करण्याबद्दल अंडरटेकींग करून दिल्यानंतरच ह्या संस्थेला सभासदत्व देण्यांत यावे असे वाटते. तसेच धनलक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सह. पत संस्था म. धानला ह्या संस्थेचे अद्यावत आर्थिक पत्रके बोलाविण्यांत यावी व नंतरच

सभासदत्वाकरिता ह्या संस्थांचे अर्ज सादर करावे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन धनलक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सह. पत संस्था मर्या, खानला ता. मौदा ह्या संस्थेला अद्यावत आर्थिक पत्रके बँकेला सादर करण्याबाबत कळविण्यांत यावे. शिवम् ग्रामीण बिगर शेती सह. पत संस्था मर्या, निहारवाणी ता. मौदा ह्या संस्थेला आपले बँकेचे एक शेअर व्यवहार करण्याकरिता ॲफेडेव्हीट करून दिल्यानंतर बँकेचे सभासदत्व देणे बाबत विचार करणेत येईल असे कळवावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ४ :- बँकेचे माहे जुलै २००१ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.
ठराव क्रमांक ४ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा. सरव्यवस्थापक यांनी बँकेच्या माहे जुलै २००१ मध्ये झालेल्या खर्चाबाबत सभेला माहिती दिली विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या माहे जुलै २००१ मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ५ :- बँकेच्या दिनांक ३१ जुलै २००१ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल गुंतवणुकीच्या परिस्थितीची नोंद घेणे.
ठराव क्रमांक ५ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा. सरव्यवस्थापक यांनी बँकेच्या दिनांक ३१ जुलै २००१ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल गुंतवणुकीच्या परिस्थितीची सभेला माहिती दिली. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या दिनांक ३१ जुलै २००१ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल गुंतवणुकीच्या परिस्थितीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ६ :- मा. अध्यक्ष यांचे परवानगीने येणारे विषयावर चर्चा करणे.
विषय क्रमांक ६(१) :- बँकेचे मुख्य कार्यालय व शाखांमध्ये सिक्युरिटी गार्ड ठेवणे संदर्भात करावयाच्या करारनाम्याविषयी मे. नोएल सिक्युरिटी सर्व्हीस, नागपूर यांचे विनंतीपत्रावर विचार करणे.
ठराव क्रमांक ६(१) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, मागील दिनांक ३०.६.२००१ रोजीचे सभेतील निर्णयानुसार मे. नोएल सिक्युरिटी सर्व्हीस, नागपूर यांनी बँकेला जुन्याच दरांत सिक्युरिटीची सेवा (सर्व्हिस) देण्यात यावी.

Exh 3159.



याकरिता करारनामा करुन घेण्यास त्यांना कळविण्यांत आले होते. सदर पत्राचे अनुषंगाने दिनांक २४.६.२००१ रोजी मे. नोएल सिक्युरिटी सर्व्हीस, नागपूर यांनी सर्व्हीस टॅक्सेस व चार्जेस मध्ये वाढ झाल्यामुळे जुने दरांत सिक्युरिटी सेवा (सर्व्हीस) देणे परवडणार नाही असे कळविले असून, कोटेशनमध्ये नमुद केलेल्या दरानुसार नविन करारनामा करुन दिल्यास बँकेला यापेक्षा चांगली सेवा देण्याचे त्यांनी पत्रांत नमुद केले आहे. त्यांचे जुने दर व कोटेशनमध्ये नमुद केलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | सध्याचे दर (जुने दर) | कोटेशनचे दर |
|---|---|---|---|
| १. | सिक्युरिटी गार्ड (शहरांत) | रु.१२००/- प्र.म. | रु. १५००/- प्रतिमहिना |
| २. | सिक्युरिटी गार्ड (शहराबाहेर) | रु.१४००/- --"-- | रु.१७००/- --"-- |
| ३. | गनमॅन | रु.२२००/- --"-- | रु.२७००/- --"-- |

विषयावर सविस्तर चर्चा होउन मागिल दिनांक ३०.६.२००१ रोजीचे सभेत ठरल्याप्रमाणे मे. नोएल सिक्युरिटी सर्व्हीस नागपूर यांना कळविण्यांत आल्यानुसार बँकेत सिक्युरिटी सेवा जुन्याच दराने ठेवण्याकरिता करारनामा करुन घेण्यात यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६(२) :: बँकेच्या तरला जींदगीसाठी राखावयाच्या निधीचे विनीयोग बाबत माहिती देणे.

ठराव क्रमांक ६(२) : मा. अध्यक्ष यांचे परवानगीनुसार मुख्यव्यवस्थापक यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या तरला जींदगीसाठी राखावयाच्या निधीच्या विनियोग केंद्र सरकारच्या कर्ज रोख्यांमध्ये गुंतवणुक करुन ठेवावा लागतो. त्यानुसार दिनांक ३०.६.२००१ ला बँकेने वेळोवेळी केलेल्या गुंतवणुकीच्या तपशिलाबाबत माहिती दिली. बँकेनी एस जी एल मार्फत एकुण रु.७५,०० कोटि व सेबीचे (सिक्युरिटि अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) चे अधिकृत प्रतिनिधी होम ट्रेडच्या माध्यमातून एकुण रुपये १५०.००कोटि च्या फिजीकल सेक्युरिटीज याप्रमाणे एकुण रुपये २२५.०० कोटिच्या सरकारी प्रतिभुती मध्ये गुंतवणुक केलेली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेच्या तरला जींदगीसाठी राखावयाच्या निधीचे विनियोगाबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६(३): बँकेच्या वकिलांचे पॅनेलवर बँकेकडे आलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ६(३): मा. अध्यक्ष यांचे परवानगीनुसार मा. सरव्यवस्थापक यांनी बँकेच्या वकिलांचे पॅनेलवर नियुक्तीसाठी ॲड. स्वप्नील खटी यांनी बँकेकडे अर्ज सादर केला आहे. त्यांनी सादर केलेल्या अर्जानुसार त्यांचे शिक्षण एम.ए., एल.एल.बी झाले असून त्यांनी बँक, कंपनी, सोसायटीशी संबंधित सिव्हील, कोऑप, ग्राहक न्यायालयांतील केसेस बाबतचा अनुभव असल्याचा उल्लेख केला आहे. व याबाबत त्यांना ५ वर्षांचा अनुभव असल्याची माहिती सभेला दिली.

बँकेचे वकिलांचे पॅनेलवर ॲडव्होकेट स्वप्नील खटी यांनी बँकेकडे सादर केलेल्या अर्जावर सविस्तर चर्चा होऊन त्यांचा अनुभव व शैक्षणिक पात्रता पाहता ॲडव्होकेट खटी त्यांना वकिलांचे पॅनेलवर नियुक्ती देण्यांत यावी आणि त्यांना बँकेच्या केसेस बद्दल द्यावयाचे रेम्युनरेशन बाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक मर्या., नागपूर.

बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा सोमवार दिनांक २८.९.२००१ रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्यकार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत" बँकेच्या उपाध्यक्षा मा. सौ. आशाताई महाजन यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. त्यासभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

-उपस्थित -

| | |
|---|---|
| १. मा. सौ. आशाताई महाजन | सभाध्यक्षा तथा उपाध्यक्षा |
| २. मा. श्री. भा. व. शहाणे | सदस्य |
| ३. मा. श्री. व. भा. वांढे | " |
| ४. मा. श्री. अ. य. गुजर | " |
| ५. मा. श्री. शा. ग. धवड | " |
| ६. मा. श्री. ग. के. शाहिर | " |
| ७. मा. श्री. मु. त्रि. पन्नासे | " |
| ८. मा. श्री. व. क. पारशिवनीकर | " |
| ९. मा. श्री. चं. लु. समर्थ | " |
| १०. मा. सौ. मिलाताई कुंभारे | सदस्या |
| ११. मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

- अनुपस्थित -

| | |
|---|---|
| १. मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |

२. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
३. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (बँक), नागपूर.
४. मा. विभागीय अधिकारी, म.रा.स. बँक लि., विभागीय कार्यालय, नागपूर.

बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनील केदार सभेला उपस्थित नसल्याने त्यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेस उपस्थित मान्यवरांचे स्वागत करुन मा. उपाध्यक्षा सौ. आशाताई महाजन यांनी सभेचे कामकाजास सुरुवात केली.

---

विषय क्रमांक १ :- मागील दिनांक २५.८.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा. सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा करतांना मा. श्री. पारशिवनीकर संचालक म्हणाले की, ठराव क्रमांक ३ मध्ये शिवम् ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था म. निलडोह व धनलक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था म. धानला ह्या संस्थांना बँकेचे सभासदत्व मंजूरी बाबत किंवा नामंजुरीबाबत उल्लेख नाही. म्हणून सदर ठरावाचे शेवटी सदर संस्थांना

बँकेचे सभासदत्व देण्याचे स्थगित ठेवण्यांत यावे. ह्या संस्थांकडील माहिती प्राप्त झाल्यानंतरच बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी ह्या संस्थांचे अर्ज मा प्राप्त माहितीसह सभेत ठेवण्यांत यावे. अशी दुरुस्ती करणेत यावी. माननिय श्री व.क. पराशिवनीकर यांनी सुचविलेल्या दुरुस्तीस मा.श्री.ग.के.शाहीर यांनी दुजोरा दिला.

विषयावर सविस्तर चर्चा होउन मागील दिनांक २५.८.२००७ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्रमांक ३ मध्ये शेवटी 'बँकेचे सभासदत्व मिळणेकरिता प्राप्त झालेले सदर संस्थांचे अर्ज स्थगित ठेवण्यांत यावे. वरीलप्रमाणे त्यांचेकडून माहिती प्राप्त झाल्यानंतरच बँकेचे सभासदत्वाकरिता ह्या संस्थांचे अर्ज संपूर्ण माहिती सह पुढील सभेत ठेवण्यांत यावे. अशी दुरुस्ती घेण्यांत यावी असे ठरले. वरील प्रमाणे दुरुस्तीसह मागील सभा दिनांक २५.८.२००७ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते ~~कायम~~ मंजूर

विषय क्रमांक २ :- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ : मा. सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. विषयानुषंगाने मागील सभा दिनांक २५.८.२००७ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची थोडक्यांत माहिती बँकेचे सरव्यवस्थापक यांनी सभेला दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

विषय क्रमांक ३ :- बँकेच्या माहे आगस्ट २००७ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ :- मा. सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या माहे ऑगस्ट २००७ मध्ये झालेल्या खर्चाची माहिती सोबतचे स्टेटमेंटप्रमाणे मान्यतेसाठी सभेत ठेवण्यांत आली आहे. विषयावर चर्चा करतांना श्री. पाराशिवनीकर संचालक यांनी भाडे, कर, विमा, विज यातील अ) भाडे ऐवजी अ) इमारत भाडे अशी दुरुस्ती करण्यांत यावी अशी सुचना केली.

विषयावर सविस्तर चर्चा होउन माहे ऑगस्ट २००७ मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली. खर्चाचे स्टेटमेंटमधील क्रमांक ५ चे अ) भाडे ऐवजी अ) इमारत भाडे अशी दुरुस्ती करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ४ :- बँकेचे माहे ऑगस्ट २००७ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरत्या औदगत्त्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ :- मा. सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगीतले की, बँकींग रेग्युलेशन अॅक्ट १८ अन्वये एकूण डिमांड अॅड टाईम लायबीलिटीज्च्या कमीत कमी ३% रोख निधी व कलम २४ अन्वये डिमांड व टाईम लायबीलिटीजच्या कमीत कमी २५% तरती औदगी राखावयाची आहे. बँकेने याप्रमाणे प्रत्यक्षांत रोख निधी व तरती औदगी थोडी जास्तच राखली आहे. विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेच्या ३१ ऑगस्ट २००७ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरत्या औदगत्त्या परिस्थितीची नोंद घेण्यात आली.

---

विषय क्रमांक ५ :- बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आलेल्या सहकारी संस्थांचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५ :- मा. सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगीतले की, बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी रामटेक तालुका प्राथमिक शिक्षक समिती सहकारी पत संस्था मर्या. रामटेक व विद्यामंदीर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. कोराडी ह्या संस्थांनी आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर केले आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होउन रामटेक तालुका प्राथमिक शिक्षक समिती सहकारी पत संस्था म. रामटेक या संस्थेला बँकेचे सभासदत्व देण्याचे तात्पुरते स्थगित ठेवण्यांत यावे व संस्थेची अद्यावत माहिती मागविण्यांत यावी. विद्यामंदीर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. कोराडी ह्या संस्थेला बँकेचे सभासदत्व देण्याचे मान्य करण्यांत आले, याकरिता विद्यामंदीर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पत संस्थेला सभासद फी व प्रवेश फी बँकेत जमा करण्यास कळविण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ : मुख्य कार्यालयाचे प्रशासन विभागांतील फर्निशिंग कामाचे आर्कीटेक्ट कडून प्राप्त झालेले अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ६ :- मा. सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगीतले की, मुख्य कार्यालयातील लेखा विभाग व कर्ज विभाग येथे अद्यावत फर्निशिंग, इलेक्ट्रीफिकेशनची कामे करून घेण्यांत आली आहेत. त्याप्रमाणे प्रशासन विभागांत कामे करून घ्यायची आहेत. या करिता बँकेचे पॅनेलवरील आर्कीटेक्ट कडून प्रशासन विभागाचे फर्निशिंग

इलेक्ट्रीफिकेशन इत्यादिंचे मॅप व लेआउट तयार करण्यात आले आहे. प्रशासन विभागात सक्करदरा शाखेत असलेला स्टेशनरी विभाग आणावयाचा असून याकरिता सुध्दा अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे श्री चिंचमलातपूरे, आर्किटेक्ट यांनी खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार केले आहे.

१. फर्निशिंगची कामे. रुपये १३९५२२५.००
(प्रोव्हायडींग व फिक्सींग फुल हाईट डबल पार्टीशन पार्टली पॅनलड, पार्टली ग्लेझ्ड पार्टीशन, टेबल रॅक्स, रॅक्स अटॅच टू पार्टीशन, फ्लटीक इमल्शन पेंट, फिलमेंटस, अॅंटी स्टॅटीक पेस्ट, सोफा, आर्टीफिशियल फ्लावर्स इत्यादि कामे)

२. इलेक्ट्रीकल वर्क्स रुपये ६५१२५.००
(रिमुव्हींग ऑफ एक्झीस्टींग इले. वायरिंग, फॉईटस, सर्कीट्स, एसीबी बॉक्स, पोल आयसोलेटर, मिरर ऑप्टीक ट्युब, रेग्युलेटर, एलसीबी फिक्सींग ऑफ ट्युब लाईट व फॅन्स इत्यादि).

३. ५% प्रमाणे कान्टेजेंसी रुपये ७३०१६.००

(एकुण) रुपये १५३३३६६.००

४% प्रमाणे आर्कीटेक्ट फी रुपये ६१३३४.००
५% प्रमाणे आर्कीटेक्ट फी वरील सर्व्हिस टॅक्स रुपये ३०६६.००

रुपये ६४४००.००

विषयावर सविस्तर चर्चा होउन मुख्य कार्यालयाचे प्रशासन विभागातील फर्निशिंग व इलेक्ट्रीकल वर्क्सचे बॅंकेचे पॅनलवरील आर्कीटेक्ट श्री. चिंचमलातपूरे यांनी सादर केलेले अंदाजपत्रक रुपये १५३३३६६.०० यावरील ४% आर्कीटेक्ट फी रुपये ६१३३४.०० व आर्कीटेक्ट फी वरील ५% सर्व्हीस टॅक्स रुपये ३०६६.०० मंजूर करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ८:- ग्रामपंचायत बेला यांचेकडून शाखा इमारतीकरिता जागेची नविन लिजडिड करुन घेण्यास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ८:- मा. सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांची परवानगी न घेता बेला ग्रामपंचायत यांनी बॅंकेच्या बेला शाखेची इमारत बांधणेकरिता ५१७० चौरस फुट जागा रुपये २५०००/- ला विकत दिली. व दिनांक १७.६.९९ रोजी विक्री करुन देण्यात आली. जिल्हा परिषद नागपूर यांची परवानगी न घेतल्यामुळे दिनांक १७.६.९९ रोजी केलेली विक्री रद्द केली. त्यामुळे बेला ग्रामपंचायत यांनी नविन प्रस्ताव पाठवून जागा -

विक्रीसाठी परवानगी मागितली. जिल्हा परिषद, नागपूर यांनी २२२२ चौरसफुट जागा रूपये 30,000/- ला 30 वर्षाचे लिजवर विकण्यास परवानगी दिल्याचे ग्रामपंचायत बेला यांनी बँकेस कळविले आहे. त्यानुसार बेला ग्रामपंचायत यांचेशी लिजडिड करून घ्यावे लागेल. बँकेने दिनांक १७.६.९९ ला विक्रीपत्राचे वेळेस रूपये २५०००/- अदा केले आहे रूपये ५०००/- देवुन लिजडिड करून घ्यायचे आहे. ग्रामपंचायत बेला यांनी रूपये ५०००/- घेवुन (एकूण) रूपये 30000/- ला जागेची लिजडिड करून देण्यास पत्राद्वारे प्राप्त झालेली मंजूरीप्रमाणे कळविले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन बेला ग्रामपंचायत यांना दिनांक १७.६.९९ ला रूपये २५०००/- अदा केले असल्यामुळे आणखी रूपये ५०००/- देवुन कायदेशिररित्या सर्व बाबींचा उल्लेख करून लिजडिड करून घेण्यात यावे असे ठरले. लिजडिड करण्याचे अधिकार बँकेचे सरव्यवस्थापक / व्यवस्थापक यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ८ :- मा. अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ८(१) :- महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे ओव्हर ड्राफ्ट मर्यादा नुतनीकरणास अर्ज करणे.

ठराव क्रमांक ८(१) : मा. सभाध्यक्षा यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड, मुदती ठेवीच्या तारणावर घेण्यांत आलेल्या रूपये 340.00 लाख ओव्हर ड्राफ्ट मर्यादेची मुदत दिनांक 30.9.2001 ला संपत असल्याने ओव्हर मर्यादेचे नुतनीकरण करणेकरिता अर्ज करावयाचा आहे. याकरिता खालीलप्रमाणे ठराव करावयाचा आहे.

## - RESOLUTION -

Resolved that the Maharashtra State Cooperative Bank Ltd. (Incorporating the Vidarbha Cooperative Bank Ltd.), Regional office, Nagpur be requested to sanction the overdraft limit of Rs. 340.00 lakhs or to the extend of amount available and permissible under their rules on pledge of their fixed deposits receipts of the face value of Rs. 400.00 lakhs upto 30th September, 2004 and the limit of Rs. 20.00 lakhs out of Rs. 340.00 lakhs be made available at their Head office, Bombay.

Further resolved that any one from Group 'A' and one from Group 'B' of the following persons jointly be and are hereby authorised to apply for accommodation and executive necessary documents pertains into the said accommodation.

1. Shri Sunil Kedar chairman } Group 'A'
2. Sau. Ashatai Mahajan Vicechairman } Group 'A'
3. Shri A. N. Chaudhary General Manager } Group 'B'
4. Shri S. S. Gode Manager (Office) } Group 'B'

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ८(२) :- बँकेची कवडस येथील शाखा दाभा (एरणगांव) येथे स्थानांतरीत करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८(२) :- मा. सभाध्यक्षा यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, हिंगणा तालुक्यात दिनांक २.५.८४ ला कवडस येथे सुरु करण्यात आलेली शाखा कार्यरत असून शाखेस कवडस, दाभा (एरणगांव), मोहगांव (ढोले) आमगांव व सुकळी बाजारगांव ह्या ५ सेवा सहकारी सोसायट्या संलग्न असून ह्या शाखेमार्फत दोन शाळांचे पगार केले जातात.

कवडस या गावाजवळच दाभा हे गांव मोठे असून आर्थिक व्यवहाराचे दृष्टीने तसेच जास्त प्रमाणांत ठेवी मिळण्याचे दृष्टीने योग्य आहे असे वाटते. कवडस शाखेचे कार्यालय दाभा (एरणगांव) ह्या गांवी स्थानांतरीत केल्यास मोठ्या प्रमाणावर ठेवी मिळण्याची शक्यता आहे. कवडसपेक्षा दाभा हे गांव कास्तकारांच्या सोयीचे दृष्टीने सोयीस्कर व योग्य आहे. दिनांक २०.८.२००१ रोजी मा. इमारत देखरेख व बांधकाम उपसमितीचे सभेने कवडस शाखा दाभा (एरणगांव) ह्या गांवी स्थानांतरीत करणेत यावी अशी शिफारस केली आहे. व दाभा येथील हिंगणा खरेदी विक्री सहकारी संस्थेचे संकुलात बँकेच्या शाखेकरिता गाळा मिळावा म्हणून हिंगणा खरेदी विक्री समिती म. हिंगणा ह्यांना प्रस्ताव पाठवून विनंती करण्यात आली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन मा. ईमारत देखरेख व बांधकाम उपसमितीने शिफारस केल्याप्रमाणे बँकेची कवडस शाखा दाभा (एरणगांव) येथे स्थानांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ८(३) : बँकेत वकिलांच्या पॅनेलवर घेण्यासाठी ॲड. शंतनू घाटे यांचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ८(३) : मा. सभाध्यक्षा यांनी सांगितले की, बँकेत वकिलांच्या पॅनेलवर घेण्यासाठी ॲड. शंतनू घाटे यांचा अर्ज आलेला आहे. बँकेच्या पॅनेलवर घेऊन बँकेच्या केसेस सोपविण्यासाठी त्यांनी विनंती केली आहे. सादर केलेल्या बायोडाटानुसार त्यांची शैक्षणिक पात्रता बी.ए. एल.एल.बी. असून त्यांना वकिलीच्या क्षेत्रातील ७ वर्षाचा अनुभव आहे. सध्या ते महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, नागपूर, नागपूर नागरीक सहकारी बँक, नागपूर, विदर्भ कोऑप. मार्केटींग सोसा. लिमि. नागपूर, नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑप. सोसायटी, नागपूर इत्यादि ठिकाणी वकिलांचे पॅनेलवर वकिल म्हणून काम करीत आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन ॲड. शंतनू घाटे यांची शैक्षणिक पात्रता, कामाचा अनुभव विचारांत घेऊन त्यांना बँकेत वकिलांचे पॅनेलवर घेण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा. सभाध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

[signature] Asha Mahajan

सरव्यवस्थापक सभाध्यक्षा तथा उपाध्यक्षा

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि., नागपूर.

बॅंकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा सोमवार दिनांक २९.१०.२००७ रोजी दुपारी १.०० वाजतां बॅंकेच्या मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बॅंकेचे अध्यक्ष मा.श्री.सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित

| | |
|---|---|
| १. मा.श्री.सुनील केदार | अध्यक्ष |
| २. मा.श्री.भा.चं.ब्राह्मणे | सदस्य |
| ३. मा.श्री.व.भा.वांढे | " |
| ४. मा.श्री.अ.य.गुजर | " |
| ५. मा.श्री.भा.ग.धवड | " |
| ६. मा.श्री.मु.भि.पन्नासे | " |
| ७. मा.श्री.चं.तु.समर्थ | " |
| ८. मा.श्री.ए.एन.चौधरी | सरव्यवस्थापक |

अनुपस्थित

| | |
|---|---|
| १. मा.सौ.आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| २. मा.श्री.ग.के.शाहीर | सदस्य |
| ३. मा.श्री.व.क.पारशिवनीकर | " |
| ४. मा.सौ.स्मिताताई कुंभारे | सदस्या |

५. मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
६. मा.विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (बॅंक), नागपूर.
७. मा.विभागीय अधिकारी, म.रा.स.बॅंक म.विभागीय कार्यालय, नागपूर.

---

सभेला अनुपस्थित असलेले सौ.आशाताई महाजन, उपाध्यक्षा, श्री ग.के.शाहीर, संचालक, श्री व.क.पारशिवनीकर, संचालक व सौ.स्मिताताई कुंभारे संचालीका यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यात आली.

यानंतर सभेला उपस्थितांचे स्वागत करून विषय पत्रिकेवरील विषयानुसार मा.अध्यक्ष यांनी सभेचे कार्यवाहीस सुरूवात केली.

विषय क्रमांक १ :- मागील सभा दिनांक २८.९.२००७ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा.अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक २८.९.२००७ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते मंजुर करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक २:- मागिल सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागिल दिनांक २८.९.२००० रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची थोडक्यात माहिती मा. सरव्यवस्थापक यांनी सभेला दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ३:- बँकेच्या माहे सप्टेंबर २००१ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा करतांना मा. श्री. पन्नासे संचालक म्हणाले की, इतर खर्चाचे शिर्षकाखाली अनुकंपा निधी खर्च दाखविला आहे. त्याबाबत माहिती देण्यांत यावी. यावर माहिती देतांना मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, जवळी शाखेतील तीन कर्मचारी एकाच अपघातात मृत्यु पावले. ह्या कर्मचाऱ्यांचे वारसदारांना कांही आर्थिक मदत करणेसाठी कर्मचारी कल्याण निधीत ~~[illegible]~~ रुपये १०.०० लाख (रुपये दहा लाख फक्त) चालु खर्चाला नांवे टाकुन जमा करण्याकरिता दिनांक ३१.८.२००१ रोजीचे मा. संचालक मंडळाचे सभेत निर्णय घेण्यांत आला आहे. त्याप्रमाणे रुपये १०.०० लाख कर्मचारी कल्याण निधीत सन २००१-२००२ चे चालु खर्चाला नांवे टाकुन वर्ग करण्यांत आले आहेत. तरी अनुकंपा निधी ह्या शब्दाऐवजी कर्मचारी कल्याण निधी हा शब्द लिहिण्यांत यावा. व दुरुस्ती घेण्यांत यावी.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन वरील प्रमाणे दुरुस्तीसह माहे सप्टेंबर २००१ मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ४: बँकेच्या दिनांक २८ सप्टेंबर २००१ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकींग रेग्युलेशन ॲक्टचे कलम १८ प्रमाणे एकूण डिमांड ॲंड टाईम लायबीलिटीजच्या कमीत कमी ३% रोख निधी आणि कलम २४ नुसार कमीत कमी २५% तरती जींदगी राखावयाची आहे. बँकेने प्रत्यक्षांत ३% पेक्षा जास्त रोख व २५% पेक्षा जास्त तरलता राखली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे दिनांक २८ सप्टेंबर २००१ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५ :- बँकेचे मुख्य कार्यालय व शाखांमध्ये रोख ठेवण्याची मर्यादा ठरविणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकींग रेग्युलेशन ॲक्टचे कलम प्रमाणे टाईम अँड डिमांड च्या कमीत कमी ३% रोख व बँकेतील शिल्लक कम ठेवणे आवश्यक आहे. दिनांक ३१.८.२००१ रोजी बँकेत असलेल्या ठेवी तसेच मुख्य कार्यालयापासून शाखेचे अंतर त्या परिसरातील आर्थिक व्यवहार इत्यादि बाबी विचारांत घेवुन २८ शाखांपैकी ६२ शाखांच्या रोख मर्यादेत अल्प वाढ सुचविली आहे. व उर्वरित शाखांची सध्याची मर्यादा कायम ठेवण्यांत आली आहे. ३% रोख व बँकेतील शिल्लक ठेवणेकरिता मुख्य कार्यालयाच्या रोख ठेवण्याचे मर्यादेत वाढ केली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन खालील प्रमाणे बँकेचे मुख्य कार्यालय व शाखांमध्ये रोख ठेवण्याची मर्यादा ठरविण्यात आली आहे. (रुपये लाखांत)

| अनु क्र. | शाखा | ३१.८.२००१ रोजी एकूण ठेवी. | सध्याची मर्यादा | वाढ | नविन मर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | मुख्य कार्यालय | १६००२.१८ | ३३२.५० | ४७०.६० | ८०३.१० |
| २. | मंगल | २६०९.१७ | ४०.०० | ३०.०० | ७०.०० |
| ३. | हनुमाननगर | ११९५.०४ | २०.०० | ५.०० | २५.०० |
| ४. | गांधीबाग | १२२१.०७ | १७.०० | ८.०० | २५.०० |
| ५. | जिल्हा परिषद | ३६१७.५८ | ४५.०० | ५.०० | ५०.०० |
| ६. | धन्तोली | १६१६.११ | २०.०० | ५.०० | २५.०० |
| ७. | रामनगर | २७६०.१७ | २३.०० | २.०० | २५.०० |
| ८. | पांचपावली | ७९४.८१ | १४.०० | ६.०० | २०.०० |
| ९. | धान्यगंज | ४३५.०८ | ४.०० | ६.०० | १०.०० |
| १०. | कळमना बाजार | १५६१.७८ | २५.०० | ५.०० | ३०.०० |
| ११. | गणेशपेठ | ८८९.०१ | १५.०० | ५.०० | २०.०० |
| १२. | जरिपटका | ३२८.२४ | ५.०० | ५.०० | १०.०० |
| १३. | कोराडी | ६०१.६३ | १४.४० | १.६० | १६.०० |
| १४. | खापरखेडा | ६९८.२७ | १५.०० | ५.०० | २०.०० |
| १५. | कामठी | ६७५.८८ | १२.५० | २.५० | १५.०० |
| १६. | पांचगांव | २७८.९५ | ६.०० | — | ६.०० |
| १७. | कन्हान | ७८७.३५ | १४.०० | २.०० | १६.०० |
| १८. | गुमगांव | २४२.९० | ५.१० | ०.९० | ६.०० |
| १९. | हिंगणा | ८८९.७४ | २०.०० | ५.०० | २५.०० |
| २०. | पेठ | ३७५.१२ | ९.०० | — | ९.०० |
| २१. | वाडी | १६३.९७ | ३.०० | — | ३.०० |
| २२. | कळमेश्वर | ११०४.४२ | २२.०० | ३.०० | २५.०० |
| २३. | बिहिरगांव | १५८.०० | ३.५० | ०.५० | ४.०० |
| २४. | वडोदा | २०५.०९ | ३.९० | ०.१० | ४.०० |
| २५. | दिघोरी स्टेशन | ९७.२५ | २.०० | — | २.०० |
| २६. | पाटनसावंगी | ५७६.४० | ११.०० | ४.०० | १५.०० |
| २७. | सक्करदरा | ७०४.३१ | ७.०० | ३.०० | १०.०० |
| २८. | बुटीबोरी | ७३२.५० | १६.०० | ४.०० | २०.०० |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| २९. | फेटरी | १७९.४८ | ४.०० | — | ४.०० |
| ३०. | झिंगाबाई टाकळी | १९५.४९ | २.०० | २.०० | ४.०० |
| ३१. | हुडकेश्वर | २१.०१ | — | १.०० | १.०० |
| ३२. | कुही | ५१९.४६ | १३.०० | १.०० | १४.०० |
| ३३. | वेलतुर | ३७३.७५ | ४.०० | २.०० | ६.०० |
| ३४. | मांढळ | १८६.३८ | ४.०० | — | ४.०० |
| ३५. | गोठणगांव | १०८.६६ | १.९० | ०.१० | २.०० |
| ३६. | कान्होलीबारा | १६१.८३ | ३.४० | १.६० | ५.०० |
| ३७. | कवडस | ४५.६१ | १.०० | — | १.०० |
| ३८. | टाकळघाट | ११९.६३ | २.२० | ०.३० | २.५० |
| ३९. | मोहगांव झिल्पी | १७३.४२ | ४.५० | ०.५० | ५.०० |
| ४०. | आडेगांव | ३५.४४ | १.०० | — | १.०० |
| ४१. | रामटेक | ५६८.०७ | १५.०० | — | १५.०० |
| ४२. | पवनी | १५६.६३ | ३.५० | ०.५० | ४.०० |
| ४३. | नगरधन | ८७.०७ | १.७० | ०.३० | २.०० |
| ४४. | देवळापार | ९०.४६ | २.०० | — | २.०० |
| ४५. | मनसर | २०२.४५ | ४.५० | ०.५० | ५.०० |
| ४६. | पाराशिवनी | ७१२.०० | २३.०० | — | २३.०० |
| ४७. | नवेगांवखैरी | ९३.२८ | १.५० | — | १.५० |
| ४८. | मौदा | ५९५.५२ | १२.०० | ३.०० | १५.०० |
| ४९. | तारसा | १६२.८२ | ३.८० | ०.२० | ४.०० |
| ५०. | अरोली | १३९.२९ | २.५० | ०.५० | ३.०० |
| ५१. | खात | १४३.६९ | ३.२० | ०.३० | ३.५० |
| ५२. | धानला | १३४.८० | ३.०० | — | ३.०० |
| ५३. | मारोडी | १७९.७६ | ४.३० | ०.७० | ५.०० |
| ५४. | रेवराळ | ९०.४२ | २.०० | — | २.०० |
| ५५. | गोवरी | १३७.९९ | ३.०० | — | ३.०० |
| ५६. | काटोल | ७६३.१७ | १७.०० | ३.०० | २०.०० |
| ५७. | कोंढाळी | ४९४.१६ | १०.०० | ५.०० | १५.०० |
| ५८. | रिधोरा | २४४.५४ | ५.७० | ०.३० | ६.०० |
| ५९. | येनवा | १५९.६१ | २.८० | ०.२० | ३.०० |
| ६०. | पारडसिंगा | ३०५.०२ | ५.०० | ३.०० | ८.०० |
| ६१. | मेटपांजरा | १३४.०२ | २.७० | ०.३० | ३.०० |
| ६२. | नरखेड | ४७७.०८ | १०.५० | ४.५० | १५.०० |
| ६३. | मोवाड | १९७.११ | ४.०० | — | ४.०० |
| ६४. | सावरगांव | ३२६.५७ | ७.२० | ०.३० | ७.५० |
| ६५. | जलालखेडा | ३५६.५५ | ७.०० | ३.०० | १०.०० |
| ६६. | पिपळा केवलराम | ९७.४८ | २.०० | -- | २.०० |
| ६७. | लोहारी सावंगा | ८९.८५ | २.०० | — | २.०० |
| ६८. | थडिपवनी | १००.२७ | २.५० | — | २.५० |
| ६९. | बेलोना | १०९.७१ | २.८० | — | २.८० |
| ७०. | मेंढला | ९०.८९ | २.०० | — | २.०० |
| ७१. | सावनेर | १०६२.३० | ३०.०० | — | ३०.०० |
| ७२. | नांदागोमुख | १८३.५५ | ४.५० | ०.५० | ५.०० |
| ७३. | खापा | ६२७.९० | १०.०० | ५.०० | १५.०० |
| ७४. | बडेगांव | ८४.९५ | २.०० | — | २.०० |
| ७५. | केळवद | ३८८.६६ | ६.०० | २.०० | ८.०० |
| ७६. | मोहपा | ३२५.३३ | ७.०० | — | ७.०० |
| ७७. | धापेवाडा | २४०.८९ | ६.०० | — | ६.०० |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ७८. | कोल्ही | १९८.५४ | ४.०० | १.०० | ५.०० |
| ७९ | उमरेड | ८५०.२७ | १७.०० | ३.०० | २०.०० |
| ८० | सोसी | २१४.९५ | ५.०० | २.०० | ७.०० |
| ८१ | बेला | ५२५.९० | १३.५० | १.५० | १५.०० |
| ८२ | मकरधोकडा | १५९.७७ | ३.०० | — | ३.०० |
| ८३. | ब्राम्हणी | ५७.४३ | १.४० | ०.१० | १.५० |
| ८४. | शेडेश्वर | ११२.७८ | २.६० | ०.४० | ३.०० |
| ८५. | भिवापूर | ३९७.४६ | ८.०० | २.०० | १०.०० |
| ८६. | नांद | ११५.८८ | २.९० | ०.१० | ३.०० |
| ८७. | बेसुर | ९३.३९ | २.०० | — | २.०० |
| ८८. | जवळी | ५८.०३ | १.४० | ०.१० | १.५० |
| ८९. | चावेर. | १८.२३ | — | १.०० | १.०० |
| | एकूण | ५६५३६.४३ | १०६०.०० | ६३६.०० | १६९६.०० |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६ :- बँकेचे संलग्न सभासद संस्थांना एका आर्थिक वर्षात खरेदी केलेल्या हिस्स्याचे प्रमाणपत्र देण्याचे पध्दतीत सुधारणा करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६ : मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या सभासद संस्थाकडून बँकेचे कर्ज घेतेवेळी हिस्से खरेदीकरिता रक्कम कपात केली जाते व ह्या कपात केलेल्या रकमेचे हिस्स्याचे प्रमाणपत्र तयार करुन त्यावर बँकेचे व्यवस्थापक व दोन संचालकांच्या सह्या घेतल्या जातात. व बँकेच्या शिक्यानिशी असे प्रमाणपत्र सभासद संस्थेला जारी करण्यांत येते. अशाप्रकारे अनेकवेळा कर्जउचल केल्यास हिस्से खरेदीकरिता कपात केलेल्या रकमेचे वेगवेगळे प्रमाणपत्र देण्याची पध्दत सध्या बँकेत आहे. बँकेचे उपविधीत केवळ हिस्से प्रमाणपत्र देण्याचा उल्लेख आहे. एकाच संस्थेकडून अनेकवेळा कर्जउचल होत असल्यामुळे हिस्से खरेदी वारंवार होत असते. व वारंवार हिस्से प्रमाणपत्र तयार करावे लागतात. याकरिता एक स्वतंत्र लिपीकाचा कार्यभार होतो. तसेच स्टेशनरी खर्च पण बराच असतो. संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करुन हिस्से प्रमाणपत्र जारी करण्यास बराच अवधी लागत असल्यामुळे हिस्से प्रमाणपत्र तयार करण्याचे काम वर्षाच्या तुलनेत मागे राहते.

विषयावर सविस्तर चर्चा होउन प्रशासकीय दृष्ट्या तसेच आर्थिक दृष्टीने स्टेशनरीच्या खर्च विचारांत घेउन बँकेचे सभासद संस्था कडून कर्जाची उचल करतेवेळी हिस्से खरेदीकरिता कपात करण्यांत येणाऱ्या रकमेच्या हिस्स्याचे प्रमाणपत्र जारी करण्याचे सध्याचे पध्दतीत सुधारणा करणेत यावी व एका आर्थिक वर्षात खरेदी केलेल्या एकुण हिस्स्याचे

एकच प्रमाणपत्र कर्ज उचल करणाऱ्या संबंधित सभासद संस्थेला जारी करण्यात यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७:- बँकेच्या संगणीकृत शाखा व मुख्य कार्यालयातील संगणकिरण साहित्या च्या क्राम्प्रेन्सिव्ह वार्षिक देखभाल करारनामा करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या मुख्य कार्यालयांत व ५ शाखांमधील खरेदी करण्यांत आलेल्या मॉनिटर, सीपीयू, युपीएस, बॅटरीज कि बोर्ड, प्रिंटर्स, स्कॅनर्स, माऊस व त्या अनुषंगीक इतर साहित्यासह असलेल्या संगणकामध्ये बिघाड झाल्यास कामांत खोळंबा, अडचण निर्माण होऊ नये म्हणून सर्व्हिसिंग व पार्टस् दुरुस्ती प्रतिष्ठित कंपनीकडून करून घेणे आवश्यक आहे. याकरिता प्रतिष्ठित कंपन्यांकडून कोटेशन मागविण्यांत आलेत.

१. मे. माइक्रो प्रो. सॉफ्टवेअर प्रा.लि. नागपूर.

२. मे. इन्फोटेक टेलीकॅम्युनिकेशन अँड आय.टी. सोल्युशन

३. मे. डाटा टॉनीक्स सिस्टिम प्रा.लि.

या कंपन्याकडून प्राप्त झालेल्या कोटेशनमध्ये मे. इन्फोटेक टेलीकम्युनिकेशन अँड आयटी सोल्युशन यांचे दर किमान आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या शाखा व मुख्य कार्यालयांतील हार्डवेअर संगणक साहित्याची देखभाल व दुरुस्ती करणे करिता मे० इन्फोटेक टेलीकम्युनिकेशन अँड आयटी. सोल्युशन या कंपनीशी रूपये ४.५० लाखांत वार्षिक देखभाल व दुरुस्ती करिता काम्प्रेंसीव्ह करारनामा करण्यांत यावा. करारनामा करण्याचे अधिकार मा० सरव्यवस्थापक / व्यवस्थापक यांना देण्यांत येत आहे. असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ८:- बँकेच्या पॅनेलवर घेण्यासाठी आलेल्या श्री.पी.के.खेडकर चार्टर्ड इंजिनियर यांचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ८:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, श्री. पी.के.खेडकर चार्टर्ड इंजिनियर व व्हॅल्युअर नागपूर यांचा अर्ज त्यांना आपल्या बँकेचे पॅनेलवर घेण्यात यावे म्हणून आलेला आहे. ते जमिन इमारत, शेती, तसेच प्लॅंट अँड माशिनरी व इतर मालमत्तेचे मुल्यांकन करतात. त्यांची शैक्षणिक पात्रता बी.ई.एम.आई.ई. एफ.आय.व्ही. आहे. सध्या ते विविध संस्थांचे

पॅनेलवर काम करीत आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री. पी. के. खेडकर चार्टर्ड इंजिनियर व व्हॅल्युअर, नागपूर यांना बँकेचे पॅनेलवर घेण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६:- रोड ट्रान्सपोर्ट योजने अंतर्गत कर्जवाटप केलेल्या उद्योजकांकडील थकबाकी रकमेची वसुली होण्यासाठी सहकार न्यायालयांत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ९१ अंतर्गत दावा दाखल करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, रोड ट्रान्सपोर्ट योजने अंतर्गत खालील उद्योजकांना जामिनदार घेऊन कर्जवाटप करण्यांत आले.

| उद्योजक | जामिनदार |
|---|---|
| १. श्री शांताराम नानाजी मोवाडे<br>मु. महासावंगी<br>पो. धापेवाडा<br>ता. कळमेश्वर<br>जि. नागपूर | १. श्री नानाजी ज्ञानबाजी मोवाडे<br>मु. महासावंगी पो. धापेवाडा<br>ता. कळमेश्वर जिल्हा नागपूर<br>२. श्री विठोबा भोजराज रोगे.<br>मु. महासावंगी पो. धापेवाडा<br>ता. कळमेश्वर जि. नागपूर. |
| २. श्री कृष्णा दयाराम घायवट<br>मु. पो. धापेवाडा<br>ता. कळमेश्वर<br>जि. नागपूर | १. श्री दयाराम गणपत घायवट<br>मु. पो. धापेवाडा<br>ता. कळमेश्वर जि. नागपूर<br>२. श्री तुकाराम सिताराम घायवट<br>मु.पो. धापेवाडा ता. कळमेश्वर<br>जिल्हा नागपूर. |
| ३. श्री सुनील बालाजी पेशने<br>मु. गाडीखाना, महाल<br>नागपूर | १. श्री बालाजी सिताराम पेशने<br>मु. गाडीखाना, महाल नागपूर.<br>२. श्री विनोद योगराज शेंडे.<br>रा. वैशालीनगर, नागपूर. |

रोड ट्रान्सपोर्ट योजनेअंतर्गत घेतलेल्या कर्जाची उपरोक्त उद्योजकांनी नियमित कर्जपरत फेड केली नसल्यामुळे व त्यांचेकडे कर्ज थकित झाल्यामुळे बँक कर्जविषयी व नजर गहाणातील त्यांचेकडे असलेले वाहन बँकेचे सिजर मार्फत ताब्यात घेऊन क्रमांक १ व २ चे वाहनांची कराराद्वारे व क्रमांक ३ चे वाहनाची जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यांत आली. वाहनाच्या विक्रीतून आलेली रक्कम त्यांचे कर्जखात्याला जमा करण्यांत आल्यानंतर ही त्यांचेकडे दिनांक ३०.९.२००१ अखेर खालील प्रमाणे कर्जबाकी राहीले.

अनुक्रमांक उद्योजकाचे नांव मुद्दल व्याज एकूण.

१. श्री शांताराम नानाजी मोवाडे रु. २४८४१.१० + रु. २३२७.३९ = रु. २७१६८.४९
२. श्री कृष्णा दयाराम धायवट रु. ६०८१९.२८ + रु. ५१८९.२० = रु. ६६१९८.४८
३. श्री सुनिल बालाजी पेशने रु. ५१३९९.५९ + रु. २९२६.०० = रु. ५४३२५.५९

वरिलप्रमाणे दिनांक ३०.९.२००१ अखेर असलेली कर्जबाकी परतफेडी करिता त्यांना व त्यांचे जमानतदारांना १४ दिवसाची नोटीस देण्यांत आली. परंतु त्यांनी या मुदतीत कर्जाचा भरणा केला नाही. त्यामुळे त्यांचेकडे असलेल्या कर्जाची कर्ज-वसुली करणेसाठी उद्योजक व त्यांचे जमानतदार यांचे विरुध्द मा. सहकारी न्याया-लयांत दावा दाखल करावयाचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री शांताराम नानाजी मोवाडे व त्यांचे दोन जमानतदार (श्री नानाजी जानबाजी मोवाडे व श्री विठोबा भोजराज रोंगे), श्री कृष्णा दयाराम धायवट (त्यांचे दोन जमानतदार (श्री दयाराम गणपत धायवट व श्री तुकाराम सिताराम धायवट) आणि श्री सुनिल बालाजी पेशने (त्यांचे दोन जमानतदार (श्री बालाजी सिताराम पेशने व श्री विनोद योगराज शेंडे) यांचेकडे रोड ट्रान्सपोर्ट अंतर्गत कर्जवाटप केलेल्या रकमेची थकित झालेली कर्जबाकी बँकेने वेळोवेळी सुचना देऊनही भरली नसल्यामुळे बँक कर्जावरिल व नजर गहाणां-तील वाहने जप्त करून विक्री करण्यांत आली व विक्रीतून आलेली रक्कम त्यांचे कर्जखात्यांत जमा करण्यांत आली. त्यानंतरही त्यांचेकडे कर्जबाकी शिल्लक राहते. सदर कर्जबाकी भरणा करणेसाठी मुदत देऊनही कर्ज वसुली भरली नाही. म्हणून त्यांचेकडे असलेली कर्जबाकी वसुलीसाठी उपरोक्त उद्योजक व त्यांचे जमानतदार यांचे विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६०-चे कलम ९१ अंतर्गत मा. सहकारी न्यायालय, नागपूर येथे दावा दाखल करण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १०:- मा. अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने ऐनवेळी येणारे विषया-वर चर्चा करणे.

विषय क्रमांक १०(१):- महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे रुपये २.४० लाखाचे अतिरिक्त भाग खरेदीकरिता मंजुरी देणे.

ठराव क्रमांक १०(१):- मा. अध्यक्ष महोदय यांनी सभेला माहिती देताना सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून चालु वर्षात रुपये २०९९.०० लाख कर्ज मर्यादा उचल केली आहे. आपले बँकेने या आधी रुपये १०.४६ लाखाचे शेअर्स खरेदी केले आहेत. उचल केलेल्या मर्यादेवर रुपये १२.९३ लाखाचे शेअर्स खरेदी करणे आवश्यक असल्याने रुपये २.४७ लाखाचे अतिरिक्त शेअर्स घ्यायचे आहेत. याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला ठराव पाठवावयाचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांचेकडून चालु वर्षात घेतलेल्या कर्ज मर्यादेवर नियमाप्रमाणे रुपये ११.१३ लाखाचे शेअर्स खरेदी करायचे असल्याने रुपये २.६७ लाखाचे अतिरिक्त शेअर्स खरेदीसाठी मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत करावयाच्या अर्जावर सह्या करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना देण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १०(२) :- एकाधिकार कापूस खरेदी योजना २००१-२००२ हंगामातील कापूस खरेदीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत कापूस कर्ज सहभाग योजनेत निधी गुंतवणुक करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १०(२) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई यांनी त्यांचे दिनांक १८.१०.२००१ चे पत्राप्रमाणे २००१-२००२ हंगामात कापूस खरेदीसाठी करावयाच्या कर्ज पुरवठ्यात आपली बँक सामील होऊ इच्छित असल्यास ठरावासह त्वरित कळविण्यास कळविले आहे. कापूस कर्ज सहभाग योजनेत गुंतविलेल्या रकमेवर मिळणाऱ्या व्याजाचा दर १४½% राहणार आहे. मागील दोन वर्षात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत कापूस कर्ज सहभाग योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. या वेळेस सुध्दा आपले बँकेचा सहभाग असावा असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेकडे उपलब्ध असलेल्या अतिरिक्त निधी विचारांत घेऊन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत कापूस कर्ज सहभाग योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून द्यावा असे ठरले. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून वेळोवेळी आलेल्या मागणीनुसार बँकेकडे उपलब्ध असलेला अतिरिक्त (सरप्लस) निधीचा विचार करून कापूस कर्ज सहभाग योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यात येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १०(३) :- फ्रेंडस कॉलनी, काटोल रोड, नागपूर येथे बँकेची नविन शाखा उघडणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १०(३) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, काटोल रोडवरील गिट्टीखदान व त्यापुढील परिसरात आपल्या बँकेची एकही शाखा नाही. त्यामुळे या परिसरांतील लोकांना आपल्या बँकेशी व्यवहार करणे करिता जिल्हा परिषद, रामनगर, झिंगाबाई टाकळी किंवा इतर शाखेशी संपर्क

करावा लागतो. या परिसरांत आपले बँकेची शाखा उघडल्यास आपले बँकेशी व्यवहार करु इच्छिणाऱ्या ग्राहकांचा त्रास वाचेल. यावर मा. श्री. पल्लासे संचालक म्हणाले की, या भागांत आपले बँकेची शाखा नसल्याने काटोल रोडवरील फ्रेंडस कॉलनी हे ठिकाण नविन शाखा उघडण्यास चांगले असल्याचे सुचविले. मा. श्री. वांढे संचालक यांनी पारशिवनी तालुक्यातील निंबा व साटक या ठिकाणी बँकेच्या नविन शाखा उघडण्यांत याव्या असे सुचविले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन काटोल रोडवरील फ्रेंडस कॉलनी नागपूर येथे बँकेची नविन शाखा उघडणेत यावी असे ठरले. याकरिता आवश्यक ती परवानगी मिळणेकरिता सहकार खात्याकडे प्रस्ताव पाठविणेस कार्यवाही करणेत यावी असे ठरले. तसेच पारशिवनी तालुक्यातील निंबा व साटक या गांवी बँकेच्या नविन शाखा उघडण्याकरिता सहकार खात्याकडे परवानगी मिळणेस्तव पाठपुरावा करणेसाठी कार्यवाही करणेत यावी असेही ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १०(४) :- बँकेतील कर्मचाऱ्यांना दसरा-दिवाळी सणाकरिता फेस्टीवल ॲडव्हान्स मंजूरीबाबत.

ठराव क्रमांक १०(४) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेतील कर्मचाऱ्यांना दसरा-दिवाळी सण निमित्य फेस्टीवल ॲडव्हान्स दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुध्दा मंजूर करण्यांत आला असून सदर फेस्टीवल ॲडव्हान्स दिनांक ४.१०.२००७ पासून दिवाळीपूर्वी दिनांक १०.११.२००७ पर्यंत उचल करण्यास कार्यालयाने परिपत्रक काढून शाखांना कळविले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मा. अध्यक्ष यांनी कर्मचाऱ्यांना दसरा दिवाळी सणानिमित्य फेस्टीवल ॲडव्हान्स खालील प्रमाणे मंजूर करण्याचे निर्णयास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

अ) लिपिक व अधिकारी श्रेणी — रुपये ५०००/-

ब) ड्रायव्हर व चपराशी श्रेणी — रुपये ४०००/-

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १०(५) :- मे. समृध्दी सिडस् प्रा. लि. नागपूर यांचेकडील कर्जवसुली साठी मा. सहकार न्यायालयांत दावा दाखल करणे.

ठराव क्रमांक १०(५) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, मे. समृध्दी सिडस् प्रा. लि. नागपूर या कंपनीला बँकेचे गणेशपेठ शाखेमार्फत रुपये २०.०० लाख कॅश क्रेडीट कर्ज मर्यादा खालील प्रमाणे संपत्ती गहाणांत घेउन मंजूर करण्यांत आली.

१. श्री श्रीराम व दयाराम यांचे चौधरी यांचे भांडेप्लॉट, नागपूर येथील —

रुपये ४६.०० लाख मुल्य असलेले घर क्रमांक ३०२२.

२) श्री श्रिराम व शेवराव चौधरी यांचे गाडगेनगर मधील रुपये ७.५० लाख मुल्य असलेले घर क्रमांक २७०८/क/६२.

३) सर्वश्री श्रिराम, शेवराव, दयाराम व देवराव वल्द मारोतराव चौधरी यांचे सामिल हक्कातील मौजा नरसाळा येथील रुपये १२.०० लाख मुल्य असलेली एकुण २.४३ हेक्टर जमीन बँकेचे गहाणांत घेण्यांत आली.

सदर कर्ज मर्यादेची मुदत ३०.९.२००१ ला संपली असून त्यांनी ३०.९.२००[illegible] अखेरीस व्याजाचा भरणा केलेला नाही. तसेच सदर खात्यावरील व्यवहार सुध्दा समाधानकारक नाही. अशा परिस्थितीत त्यांनी बँकेचे गहाणांत दिलेली २.४३ हेक्टर जमिन बँकेचे परवानगी शिवाय शेतीचे ७/१२ रेकार्डवरील बँकेच्या बोझ्याची नोंद काढून घेऊन दिनांक १५.६.२००१ रोजी परस्पर विकली. श्री चौधरी बंधूंची कर्ज रक्कम न भरण्याची व बँकेची गहाणातील संपत्तीची परस्पर विल्हेवाट लावण्याची कृती विचारांत घेता बँकेचे कर्जास धोका निर्माण झाला आहे म्हणून कर्जवसुली करिता कारवाई करणे आवश्यक झाले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मेसर्स समृध्दी सिडस् प्रा० लि. नागपूरचे संचालक श्री चौधरी बंधूनी कर्ज मर्यादा मंजूर करतांना गहाणांत दिलेली जमीन परस्पर विकल्यामुळे व कर्ज वसुली न भरल्यामुळे बँकेचे कर्जास धोका निर्माण झाल्याने त्यांचेकडील कर्जवसुलीसाठी मा० सहकारी न्यायालय, नाग[illegible] येथे महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ९१ अंतर्गत दावा दाखल करणेत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १०(६) :- मे० मयंक केबल इंडस्ट्रीज प्रा०लि. कळमेश्वर यांचेकडून कर्ज वसुलीसाठी मा० सहकारी न्यायालयांत दावा दाखल करणे.

ठराव क्रमांक १०(६) :- मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की मे० मयंक केबल इंडस्ट्रिज प्रा० लि० कळमेश्वर यांना रुपये ३२.०० लाखाची कर्ज मर्यादा व रुपये ७.०० लाखाची मुदती कर्ज मंजुर करण्यांत आले होते. कर्ज मर्यादेची दिनांक ३०.५.२००[illegible] पर्यंत असलेली मुदत संपली आहे. कंपनीने सदर कर्ज खात्यावरील व्यवहार थांबविले असून व्याजाचा भरणा केलेला नाही. सदर कंपनी दिनांक ३०.५.२००[illegible] पासून थकित झाली आहे. कंपनीकडे ऑक्टोबर अखेर कॅश क्रेडीट खात्यावर रुपये ३२.०० लाख मुद्दल व रुपये ३.४५ लाख व्याज, मुदती कर्जाचे खात्यावर रुपये ६.६९ लाख मुद्दल कर्जबाकी आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मे० मयंक केबल इंडस्ट्रिज

प्रा० लि० कळमेश्वर यांचे कर्जखात्यावरील व्यवहार समाधानकारक नसल्याने व दिनांक 30.4.2007 पासून थकित झाल्याने बँकेचे कर्जास धोका निर्माण झाला आहे म्हणून मे. मयंक केबल इंडस्ट्रीज प्रा० लि. कळमेश्वर कडून एकमुस्त कर्जवसुलीसाठी कंपनी कायदा अंतर्गत कार्यवाही करणेत यावी तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा 1960 चे कलम 91 अंतर्गत मा० सहकार न्यायालय नागपूर येथे दावा दाखल करण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थितांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक

अध्यक्ष

नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि; नागपूर.

बँकेच्या मा॰ व्यवस्थापक समितिची सभा बुधवार दिनांक २५.११.२००९ रोजी दुपारी ७.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयांतील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेच्या उपाध्यक्षा मा॰ सौ. आशाताई महाजन यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित

१. सौ. आशाताई महाजन — सभाध्यक्षा तथा उपाध्यक्षा
२. श्री. भा. चं. शहाणे — सदस्य
३. श्री. व. भा. वांढे — "
४. श्री. अ. य. गुजर — "
५. श्री. शा. ग. धवड — "
६. श्री. ग. के. शाहीर — "
७. श्री. मु. भि. पन्नासे — "
८. श्री. व. क. पाराशिवनीकर — "
९. श्री. चं. तु. समर्थ — "
१०. सौ. स्मिताताई कुंभारे — सदस्या.
११ श्री. ए. एन. चौधरी — सरव्यवस्थापक
१२. श्री. एस. एस. गोडे — प्रभारी व्यवस्थापक

अनुपस्थित.

१. श्री. सुनिल केदार — अध्यक्ष
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर
३. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (बँक), नागपूर.
४. विभागीय अधिकारी म.रा.सह.बँक म. विभागीय कार्यालय, नागपूर.

---

सभेला मा. श्री. सुनिल केदार, अध्यक्ष अनुपस्थित असल्याने त्यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

यानंतर सभेला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून विषय पत्रिकेवरील विषयानुसार सौ॰ आशाताई महाजन, सभाध्यक्षा तथा उपाध्यक्षा यांनी सभेचे कार्यवाहीस सुरुवात केली.

विषय क्रमांक १:- मागिल सभा दिनांक २९.१०.२००९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १:- मा॰ सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने विषयावर सविस्तर चर्चा होउन मागिल दिनांक २९.१०.२००९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

विषय क्रमांक २ :- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा० सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक २९.१०.२००१ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची थोडक्यात माहिती प्रभारी व्यवस्थापक यांनी सभेला दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यात आली.

---

विषय क्रमांक ३ :- बँकेच्या माहे आक्टोंबर २००१ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ :- मा० सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या माहे आक्टोंबर २००१ मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ४ :- बँकेच्या दिनांक ३० सप्टेंबर २००१ च्या ताळेबंद व नफातोटा पत्रक आणि दिनांक २६ आक्टोंबर २००१ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधीव तरला जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ :- मा० सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १८ प्रमाणे डिमांड ॲंड टाईम लायबीलिटीज्च्या कमीत कमी ३% रोख निधी व कलम २४ प्रमाणे कमीत कमी २५% तरती जींदगी राखावयाची आहे. बँकेने माहे आक्टोंबर २००१ मध्ये बँकींग रेग्युलेशन ॲक्टचे कलम १८ प्रमाणे रोख निधी व कलम २४ प्रमाणे तरती जींदगी राखली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या ३० सप्टेंबर २००१ च्या ताळेबंद पत्रक व नफातोटा पत्रकाची आणि दिनांक २६.१०.२००१ चे ताळेबंद पत्रक तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५(१) :- रोड ट्रान्सपोर्ट योजने अंतर्गत कर्जवाटप केलेल्या उद्योजकाकडील थकबाकी रकमेची वसुली होण्यासाठी सहकार न्यायालयांत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ९१ अंतर्गत दावा दाखल करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५(१) :- मा० सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, रोड ट्रान्सपोर्ट योजने अंतर्गत श्री कमलकुमार आत्माराम घाडी राहणार नमकगंज, नागपूर यांना ट्रक खरेदी करणेकरिता रामनगर शाखेतून कर्ज देण्यांत आले. त्यांचेकडून कर्जवसुली नियमित नसल्यामुळे त्यांनी कर्जावर घेतलेले वाहन जप्त करून विकण्यांत आले. विक्रीपोटी आलेली रक्कम कर्जखात्यांत जमा केल्यानंतरही त्यांचेकडे कर्जबाकी शिल्लक राहते.

त्यांना वेळोवेळी सुचना देऊनही कर्जबाकी वसुलिस भरली नाहि. त्यामुळे त्यांचे कडिल कर्जवसुली करणेकरिता त्यांचे विरुध्द व त्यांचे जमानतदाराविरुध्द सहकार न्यायालयांत दावा दाखल करावयाचा आहे. दिनांक ३०.९.२००१ अखेर मुद्दल रुपये ३७०४८८/- व व्याज रुपये १३०६९१/- असे एकूण रुपये ५००५९/- कर्जबाकी आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री कमलकुमार आत्माराम छाडी रा. नागपूर व त्यांचे जमानतदार श्री रुपचंद मुलचंद परमार रा. गोकुळपेठ, सिटीपोस्ट ऑफिस, इतवारा नागपूर व श्री दिपकचंद जैन, ३०७ कोठारी बिल्डींग वेस्ट हायकोर्ट मार्ग, धरमपेठ, नागपूर यांचे विरुध्द उद्योजक श्री कमलकुमार आत्माराम छाडी यांचेकडील थकबाकी रकमेची वसुली होण्यासाठी सहकार न्यायालयांत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ९१ अंतर्गत दावा दाखल करण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर

---

विषय क्रमांक ५(२) :- रोड ट्रान्सपोर्ट योजने अंतर्गत कर्जवाटप केलेल्या उद्योजकांकडील थकबाकी रकमेची वसुली होण्यासाठी सहकार न्यायालयांत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ९१ अंतर्गत दावा दाखल करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५(२) :- मा० सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, श्री राघवेंद्र बळवंतराव येरपुडे रा. नवरगांव ता. रामटेक यांना रोड ट्रान्सपोर्ट योजनेअंतर्गत मिनी बस खरेदीकरिता रामटेक शाखेतून दिनांक ६.२.९५ ला रुपये ५५८०००/- कर्ज देण्यात आले. कर्जाची परतफेड नियमितपणे केली नसल्यामुळे बँकेचे कर्जातील वाहन जप्त करुन विकण्यांत आले आणि विक्रीतून आलेली रक्कम त्यांचे कर्ज खात्याला जमा करण्यात आली. त्यानंतरही त्यांच्याकडे कर्जबाकी शिल्लक राहते. थाकरिता कर्जबाकी वसुलीत भरणेसाठी वारंवार पत्र देण्यांत आले परंतु त्यांनी केलेल्या पत्रव्यवहारास कोणताही प्रतिसाद दिला नाही व वसुलीही भरली नाही. त्यांचेकडे ऑक्टोबर २००१ अखेर मुद्दल रुपये ११८०००/- व व्याज रुपये ८८०००/- असे एकूण रुपये २०६०००/- कर्जबाकी शिल्लक राहते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री राघवेंद्र बळवंतराव येरपुडे राहणार नवरगांव ता. रामटेक यांचेकडील कर्ज वसुलीकरिता त्यांचेविरुध्द व त्यांचे जमानतदार श्री गजानन रामाजी शेंदे व सौ. रसिकाबाई बळवंतराव येरपुडे यांचेविरुध्द मा. सहकार न्यायालयांत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ९१ अंतर्गत दावा दाखल करण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर

---

विषय क्रमांक ६ :- मा० सभाध्यक्षा यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ६(१) :- बँकेच्या मुख्य कार्यालयातील इ.पी.ए.बी.एक्स.चा वार्षिक कॉम्प्रेंसिव्ह करारनामा करून घेतल्याबाबत माहिती देणे.

ठराव क्रमांक ६(१) :- मा० सभाध्यक्षा यांनी विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या मुख्य कार्यालयातील इ.पी.बी.एक्स. सिस्टीमचा वार्षिक काम्प्रेसिव्ह मेंटेनन्स करारनामा दिनांक ३० आक्टोंबर २००१ ला संपला आहे. मागील वर्षी मे. विदर्भ इन्फोटेक टेलीकम्युनिकेशन अँड आय.टी. सोल्युशन यांचेकडून रुपये ९३०००/- मध्ये करण्यांत आला होता. यावर्षी सुध्दा दिनांक १.११.२००१ ते ३१.१० २००२ ह्या एक वर्षाचे काळा वधिकरिता रुपये ९३०००/- मध्ये मे. विदर्भ इन्फोटेक टेलिकम्युनिकेशन अँड आय.टी. सोल्युशन यांचेकडून बँकेच्या मुख्य कार्यालयातील इ.पी.ए.बी.एक्स.चा वार्षिक कॉम्प्रेसिव्ह करारनामा करून घेण्यांत आला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेच्या मुख्य कार्यालयातील इ.पी.ए.बी.एक्स चा वार्षिक काम्प्रेंसिव्ह करारनामा संदर्भात दिलेल्या माहितीची सभेत नोंद ~~करण्यात~~ घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ६ (२) :- बँकेच्या संकुलासाठी विद्युत सबस्टेशन उभारणेकरिता जागा उपलब्धतेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६(२) :- मा० सभाध्यक्षा यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, महाल येथे बँकेच्या संकुल इमारतीचे बांधकाम सुरु असून त्या इमारतीकरिता स्वतंत्र विद्युत सबस्टेशनची नियोजित ठिकाणी उभारणी करायची आहे बँकेचे संकुल इमारतीचे आर्कीटेक्ट श्री मोरवा, इलेक्ट्रीकल कंसलटंट श्री करहू व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अधिकारी यांनी तांत्रिक बाबी विचारात घेउन संकुलाकरिता ११ के०व्ही ५०० / ४३३ व्होल्ट्स एक्स / ६३० के.व्ही.ए. स्वतंत्र विद्युत सबस्टेशनसाठी ~~मध्ये~~ १०मीटर x १०मीटर (१०७६ चौरस फुट) जागा निश्चित केली आहे. परंतु निश्चित केलेल्या ठिकाणी केवळ ३मीटर x १०मीटर एवढीच जागा बँकेकडे उपलब्ध आहे. तेथे लागूनच मा० विभागीय सहकारी मंडळ नागपूर यांची मोकळी असलेली जागा आवश्यकतेएवढी उपलब्ध करून घेतल्यास विद्युत सबस्टेशनची उभारणी होउ शकते. सबब विभागीय सहकारी मंडळाचे मा० अध्यक्ष यांना विद्युत सबस्टेशन करिता निश्चित केलेल्या जागेला लागून असलेली ७मीटर x १०मीटर जागेची मागणी करावी लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेच्या संकुलाचे इमारतीकरिता नियोजित ठिकाणी स्वतंत्र विद्युत सबस्टेशनचे उभारणीसाठी उपलब्ध असलेली जागा अपूरी पडत असल्याने अपूरी पडत असलेली व निश्चित केलेल्या जागेला लागून

संलग्न असलेली ७० चौरस मीटर (७५० चौरस फूट) जागा विभागीय सहकारी मंडळ, नागपूर यांचेकडून खरेदी करणेत यावी. व याकरिता त्यांचेशी पत्रव्यवहार करून विनंती करणेत यावी असे ठरले. विभागीय सहकारी मंडळ, नागपूर यांचे कडून विद्युत सबस्टेशन करिता जागा घेणेसाठी यापुढील कार्यवाही करण्याचे अधिकार बँकेचे मा० अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६(३) :- दिपक मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था मर्या. वडधामना या संस्थेकडून बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ६(३) :- मा० सभाध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आवश्यक कागदपत्र जोडून दिपक मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था मर्या, वडधामना या संस्थेने बँकेकडे अर्ज सादर केला आहे. बँकेचे तपासणी विभागामार्फत सदर संस्थेची तपासणी केली असून, संस्था चालु असल्याचे आढळून आले आहे. संस्थेची नोंदणी झाली असून संस्थेला रजिस्ट्रेशन क्रमांक ९०१ मिळाला आहे. संस्थेचे बचतठेव खाते हिंगणा शाखेत सुरू आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन दिपक मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था म. वडधामना ह्या संस्थेला बँकेला सभासदत्व देण्याचे मान्य करण्यांत आले असून सभासदत्वाकरिता आवश्यक फी व प्रवेश फी भरण्यास कळविण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

मा० सभाध्यक्ष यांचे परवानगीने झालेल्या चर्चेच्या वेळी मा. श्री. शा. ग. धवड, संचालक म्हणाले की, कर्जाची वसुली करतांना सोसायटीने पुरविलेल्या मागणी यादी (डिमांड लिस्ट) प्रमाणे कर्जवसुली केली जाते. हे बरोबर आहे. परंतु प्रत्यक्षांत कर्जदार शेतकऱ्याकडून कर्ज घेतल्याचे तारखे-पासून कर्जवसुलीच्या तारखेपर्यंतच्या कालावधीचे व्याज आकारून व्याजासह कर्जवसुली होत नाही. त्यामुळे कर्जदार शेतकऱ्यांकडील डिमांड लिस्ट-प्रमाणे कर्जमागणी व प्रत्यक्षात वसुल करावयास पाहिजे ती रक्कम यातील फरकाची रक्कम सोसायटीकडे पडली राहते. जास्त आलेल्या वसुलीची रक्कम त्यांचे बचतठेव खात्याला जमा केली जात नाही. यानंतर श्री. न. भा. वोढे संचालक म्हणाले की, सर्वच शेतकऱ्यांना शेती पिक कर्जवाटप एप्रिल महिन्यातच होते असे नाही. एप्रिल महिन्यानंतरही कर्जवाटप -

सुरु असले. अशा कर्जदार शेतकऱ्यांना सुध्दा पूर्ण वर्षाचे व्याज आकारुन कर्ज मागणी (डिमांड लिस्ट) यादी तयार केलेली असते. खरे तर अशा शेतकऱ्यांना त्यांनी ज्या महिन्यांत कर्ज घेतले असेल त्या महिन्यापासून व्याजाची आकारणी व्हावयास पाहिजे. असे मत व्यक्त केले. यावर मा० सरव्यवस्थापक यांनी सांगितले की, संस्था स्तरावर शेतकऱ्यांची कर्जमागणी वर्षभराचे व्याज आकारुन जरी दाखविली असेल तरी त्या शेतकरी सभासदांकडून कर्ज वसुलीचे वेळी प्रत्यक्ष कालावधीकरिता त्या वेळचे व्याजदराने व्याजाची आकारणी करुन तेवढेच व्याजासह वसुली करण्यात येते. ज्या शेतकऱ्यांकडून कर्जमागणी यादीप्रमाणे वर्षभराचे व्याजासह परस्पर कर्जवसुली होते त्या शेतकऱ्याचे बचतठेव खात्याला जास्त झालेल्या वसुलीची रक्कम जमा करण्याबाबत सुचना आहेत. तथापी जास्त झालेल्या वसुलीची रक्कम संबंधित शेतकऱ्याचे बचतठेव खात्याला जमा करणेकरिता नागपूर जिल्हा देखरेख समिती (नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कमिटी) ला पुन्हा कळविण्यात येईल. तसेच शेतकऱ्यांना मिळणाऱ्या रिबेटची रक्कम त्यांचे बचत ठेव खात्याला जमा करण्याबाबत नागपूर जिल्हा देखरेख समितीला पुन्हा कळविण्यात येईल.

---

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा० सभाध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

[signature] Asha Mehr...

सरव्यवस्थापक सभाध्यक्षा तथा उपाध्यक्षा

नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक मर्यादित, नागपूर.

बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा सोमवार दिनांक २८.१२.२०० रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत "बँकेच्या उपाध्यक्षा मा. सौ. आशाताई महाजन यांचे अध्यक्ष तेखाली घेण्यात आलेल्या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. सौ. आशाताई महाजन | सभाध्यक्षा तथा उपाध्यक्षा |
| २. | मा. श्री. श्रा. चं. शहाणे | सदस्य |
| ३. | मा. श्री. अ. य. गुजर | " |
| ४. | मा. श्री. शा. ग. धवड | " |
| ५. | मा. श्री. मु. भि. पन्नासे | " |
| ६. | मा. श्री. व. क. पाराशिवनीकर | " |
| ७. | मा. श्री. चं. लु. समर्थ | " |
| ८. | मा. सौ. स्मिताताई कुंभारे | सदस्या |
| ९. | मा. श्री. बी. डी. असवार, विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक), नागपूर. | |
| १०. | मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

– अनुपस्थित.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. व. भा. वांढे | सदस्य |
| ३. | मा. श्री. ग. के. शाहीर | " |
| ४. | मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर. | |
| ५. | मा. विभागीय अधिकारी, म. रा. स. बँक, विभागीय कार्यालय, नागपूर. | |

बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनील केदार, समितीचे सदस्य माननीय श्री. व. भा. वांढे व मा. श्री. ग. के. शाहीर सभेला उपस्थित नसल्याने त्यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यात आली.

यानंतर बँकेच्या उपाध्यक्षा मा. सौ. आशाताई महाजन यांनी विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कामकाजास सुरुवात केली.

विषय क्रमांक १ :- मागील सभा दिनांक २८.११.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा. सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील सभा दिनांक २८.११.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक २ :- मागिल सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा. सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. मागिल सभा दिनांक २८.११.२००७ रोजीचे सभेत पारित झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची थोडक्यांत माहिती बँकेचे सरव्यवस्थापक यांनी सभेला दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ :- बँकेच्या माहे नोव्हेंबर २००७ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ :- मा० सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेच्या माहे नोव्हेंबर २००७ मध्ये झालेल्या बँकेच्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर

---

विषय क्रमांक ४ :- बँकेच्या दिनांक ३० नोव्हेंबर २००७ रोजीचे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल्या औंदर्गीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ :- मा० सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होउन बँकेच्या दिनांक ३० नोव्हेंबर २००७ रोजीचे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला औंदर्गीच्या परिस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर.

---

विषय क्रमांक ५ :- मा. सभाध्यक्षा यांचे परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ५(१) :- इंटेरियर डिझायनर ॲंड कंसलटंट्स म्हणून बँकेचे पॅनेलवर घेणेसाठी आलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५(१) :- मा० सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मालिनी मानवेंद्र आर्कीटेक्ट यांनी बँकेचे पॅनेलवर घेणेसाठी बँकेकडे अर्ज केला आहे. मालिनी मानवेंद्र यांनी आर्कीटेक्चरची स्नातक पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी नागपूर शहरांत अनेक ठिकाणी इंटेरियर डेकोरेशनची कामे केली आहेत व काही ठिकाणी काम सुरु आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होउन मालिनी मानवेंद्र, आर्कीटेक्ट यांना बँकेच्या पॅनेलवर घेण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

---

विषय क्रमांक ५(२) :- मुदतीपूर्वी तोडलेल्या मुदती ठेव पावत्या पुर्ववत करुन देण्या-बाबत दि नागपूर महिला नागरी सहकारी बँकेनी दिलेल्या पत्रावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५(२) :- मा० सभाध्यक्षा यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, दि नागपूर महिला नागरी सहकारी बँक लि., नागपुरच्या एकूण रुपये २३.००कोटी च्या मुदती ठेवी आपल्या बँकेकडे होत्या. दिनांक १०.१०.२००१रोजी त्यांनी फोन वरुन केलेल्या सुचनेप्रमाणे आणि मुदतीपूर्वी मुदती ठेवी तोडण्याकरिता प्राप्त झालेल्या अर्जानुसार त्याच दिवशी मुदती ठेवी मुदतीपूर्वी तोडून त्यांचे चालू ठेव खात्याला रुपये १०.०० कोटी रक्कम क्लिअरींग मार्फत देय असलेल्या चेकचे पेमेंटसाठी जमा करण्यांत आली. परंतु दुसरे दिवशी दिनांक ११.१०.२००१ ला सदर बँकेच्या लिखीत विनंतीमुळे क्लिअरींग मार्फत आलेला चेक परत करण्यांत आला. दोन दिवसानंतर दिनांक १२.१०.२००१ला पत्र पाठवून प्रिमॅच्युअर्ड तोडलेल्या मुदती ठेवी प्रिमॅच्युअर्ड ब्रेकींग न करता दिनांक१०.१०.२००१ पासून पुन्हा नियमित करण्यात येण्यात यावे अशी महिला बँकेने विनंती केली. प्रिमॅच्युअर्ड तोडलेल्या मुदती ठेवी तोडल्याच्या दिनांक १०.१०.२००१ पासून पुन्हा नियमित करण्याकरिता येणाऱ्या तांत्रिक अडचणी सदर बँकेच्या लक्षांत आणून दिल्यानंतर दिनांक१६.१०.२००१ ला प्रत्येकी रुपये १.०० कोटीच्या दहा मुदती ठेवी आपल्या बँकेकडे ठेवल्या आहेत. एकदा मुदतपूर्व मुदती ठेव तोडून रक्कम चालू खाती जमा दिल्यानंतर त्याच ठेवी तोडण्याच्या तारखे-पासून पुनश्च मान्य करण्याची बँकींग प्रथात नाही असे महिला बँकेस कळविण्यांत आले आहे. तरीसुध्दा महिला बँक वारंवार पत्र पाठवून मुदती पूर्वी तोडण्यांत आलेल्या मुदती ठेवी तोडण्याच्या दिनांक १०.१०.२००१ पासून नियमित करणेकरिता विनंती करीत आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन दि नागपूर महिला नागरी सहकारी बँक लि., नागपूर नी मुदतीपूर्वी तोडलेल्या मुदती ठेव पावत्या पुर्ववत करुन देण्याबाबत विचार करणे व निर्णय घेणे याबाबतचे अधिकार बँकेचे अध्यक्ष महोदय यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

विषय क्रमांक ५(३) :- बँकेच्या वकिलांचे पॅनेलवर घेण्याबाबत ॲड० विवेक गवळी यांचेकडून आलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५(३) :- मा० सभाध्यक्षा यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, श्री विवेक नारायण गवळी, १९६ शंकर नगर, नागपूर यांनी बँकेला वकिलांचे पॅनेलवर घेणेकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. अर्जाप्रमाणे

यांची शैक्षणिक पात्रता बी.एस.सी; एल.एल. बी. आहे. ते सध्या नागपूरांतील समता सहकारी बँक, नागपूर महिला सहकारी बँक, विदर्भ कोऑप. मार्केटींग सोसायटी तसेच विदर्भ प्रिमीयर कोऑप. हाऊसींग सोसायटी या संस्थांवर काम करीत आहेत. सहकारी न्यायालयातील केसेस चालविण्याचा त्यांना असलेला अनुभव विचारांत घेता आपल्या बँकेच्या कोर्ट, दावे, केसेसकरिता, वसुलीकरिता सोयीस्कर राहील.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री विवेक नारायण गवळी ह्यांना बँकेत वकिलाचे पॅनेलवर घेण्यांत यावे व याकरिता त्यांना कळविण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ५(४) :- एम.सी.व्ही.सीच्चे विद्यार्थी अप्रेन्टीस म्हणून बँकेत घेणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५(४) :- मा. सभाध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्थेचे भगवती गर्लस् हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय तसेच एम.सी.व्ही.सी. आणि ज्योतीबा माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तसेच एम.सी.व्ही.सी. नागपूर यांनी ऑफिस मॅनेजमेंट, अंकाउंटींग व ऑडीटींग विषयाचे शिक्षण घेतलेल्या एम.सी.व्ही.सी.चे विद्यार्थ्यांची यादी बँकेस पाठवून त्यांना बँकेत शिकाउ उमेदवार (अप्रेन्टीस) म्हणून घेण्यास विनंती केली आहे. ह्या विद्यार्थ्यांना अप्रेन्टीस म्हणून बँकेत घेतल्यास बोर्ड ऑफ अप्रेन्टीसशीप ट्रेनिंग सेंटर मुंबई या संस्थेनी ठरवून दिलेली रुपये १०००/- प्रति विद्यार्थी प्रतिमाह प्रमाणे ह्या विद्यार्थ्यांवर स्टायपेंड म्हणून खर्च होणाऱ्या रकमेच्या अर्धी रक्कम ह्या विद्यार्थ्यांचा दर तिमाहीचे कामकाजाचा अहवाल सदर बोर्डकडे सादर केल्यानंतर बँकेला मिळणार आहे. सदर विद्यार्थ्यांना अप्रेन्टीस म्हणून बँकेत घेतल्यास बँकेचे शाखामधील प्रलंबित असलेली बुक बॅलेन्सींगची कामे नियमीत होउ शकतात. या दृष्टीने सादर केलेल्या यादीप्रमाणे संस्थेमार्फत सदर विद्यार्थ्यांना मुलाखतीकरिता बोलाविण्यांत आले. यादीमधील ३९ विद्यार्थी मुलाखतीकरिता उपस्थित झाले. त्यामधून योग्य अशा १९ विद्यार्थ्यांची निवड करण्यांत आली असून त्यांना अप्रेन्टीस म्हणून नियुक्त करणेसाठी आदेश द्यावयाचे आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे शाखांमध्ये प्रलंबित असलेली बुक बॅलेन्सींगची कामे नियमीत करून घेण्यास

तसेच बँकेतील इतर कामे करण्यास निवड करण्यात आले.
एम॰ सी॰ व्ही॰ सी॰ चे १९ विद्यार्थ्यांना ॲप्रेन्टीस म्हणून नियुक्ती
देण्यात यावी. आणि बोर्ड ऑफ ॲप्रेन्टीसशीप ट्रेनिंग सेंटर, मुंबई
ह्या संस्थेकडून सदर विद्यार्थ्यांच्या दर तिमाहीचे कामकाजाचा
अहवाल पाठवून स्टायपेंडवर खर्च होणाऱ्या ५०% रकमेची
भरपाई करून घेण्यात यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा॰ सभाध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक　　　सभाध्यक्षा तथा उपाध्यक्षा

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटीव्ह बँक लि, नागपूर.

बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा गुरुवार दिनांक ३१ जानेवारी २००२ रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील 'सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत' बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित

१. मा. श्री. सुनील केदार — अध्यक्ष
२. मा. श्री. भा. वे. शहाणे — सदस्य
३. मा. श्री. अ. य. गुजर — "
४. मा. श्री. शा. ग. धवड — "
५. मा. श्री. मु. भि. पन्नासे — "
६. मा. श्री. व. क. पारशिवनीकर — "
७. मा. श्री. वे. लु. समर्थ — "
८. मा. सौ. सिंधुताई कुंभारे — सदस्या.
९. मा. श्री. ए. एन. चौधरी — सरव्यवस्थापक

अनुपस्थित -

१. मा. सौ. आशाताई महाजन — उपाध्यक्षा
२. मा. श्री. व. भा. वांढे — सदस्य
३. मा. श्री. ग. के. शाहीर — "
४. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर
५. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह संस्था (बँक), नागपूर
६. मा. विभागीय अधिकारी, म. रा. सह. बँक, विभागीय कार्यालय, नागपूर.

सौ. आशाताई महाजन, उपाध्यक्षा, श्री. व. भा. वांढे, सदस्य व श्री. ग. के. शाहीर सदस्य सभेला उपस्थित नसल्याने त्यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली. यानंतर बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनील केदार यांनी विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरुवात केली.

---

विषय क्रमांक १:- मागिल सभा दिनांक २८.१२.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयानुषंगाने सविस्तर चर्चा होऊन मागिल दिनांक २८.१२.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजुर

---

विषय क्रमांक २:- मागिल सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक २४/१२/२००७ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सरव्यवस्थापक यांनी थोडक्यांत माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ३:- बँकेच्या माहे डिसेंबर २००७ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन माहे डिसेंबर २००७ मध्ये झालेल्या बँकेच्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रमांक ४:- बँकेच्या दिनांक ३१ डिसेंबर २००७ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला जिंदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या दिनांक ३१ डिसेंबर २००७ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला जिंदगीच्या परिस्थितीची नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर.

विषय क्रमांक ५:- बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी बँकेकडे आलेल्या सहकारी संस्थांचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी पंचशिल नागरी सहकारी पत संस्था मर्या. नागपूर व जयविजय नागरी पत सहकारी संस्था मर्या. नागपूर या संस्थांनी आवश्यक कागदपत्रासह बँकेचे शाखा मार्फत अर्ज सादर केले आहे.

दोन्ही संस्थांनी आपले बँकेच्या शाखेत बचती ठेव खाते उघडले असून दोन्ही संस्थांचे कामकाज सुरळीत सुरू आहे. परंतु दोन्ही संस्थांनी

रिझर्व फंडाची रक्कम बँकेमध्ये गुंतविली नाही. दोन्ही संस्था कार्यरत आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन पंचशिल नागरी सहकारी पत संस्था मर्या, नागपूर व जयविजय नागरी पत सहकारी संस्था मर्या, नागपूर ह्या दोन्ही संस्थांना बँकेचे सभासदत्व देण्यात येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रमांक ६ :- मा. अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ६(१) :- शाखा पारशिवनी येथील इमारतीचे किरकोळ काम करण्यास व त्याबाबत प्राप्त अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

ठराव क्रमांक ६(१) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, शाखा पारशिवनी येथील इमारतीचे खिडक्यांना कांचा लावणे, रंगरंगोटी व पेंटींग इत्यादिची तसेच इतर अनुषंगिक किरकोळ कामे पूर्ण करणे आवश्यक असल्याने बँकेचे पॅनलवरील आर्किटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांना सदर कामाचे अंदाजपत्रक मागितले असतां त्यांनी बँकेस सादर केले आहे. सदर अंदाजपत्रक रुपये ८०६३५/- यावर ४% प्रमाणे रुपये ३२२५/- आर्किटेक्ट फी व आर्किटेक्ट फीवर ५% प्रमाणे सर्विस टॅक्स रुपये १६१/- खालील प्रमाणे सादर केले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | रिप्लेसींग ऑफ विंडो ग्लासेस ट्रान्सफरंट व सेमीट्रान्सफरंट (४ एम.एम. थीकनेस असलेले) | रुपये | २६४००.०० |
| २. | प्रोव्हायडिंग व फिक्सींग एम.एस. हँडल व डोअर स्टॉपर | रुपये | ४५००.०० |
| ३. | प्रोव्हायडींग वाशेबल ऑईल बाँड व डिस्टेंपर | रुपये | २१०००.०० |
| ४. | प्रोव्हायडींग थ्री कोटस वॉटर प्रुफींग व वाटरींग टु. कोटस ऑफ सिंथेटीक ॲनीमल पेंटस् फॉर विंडोज ॲंड डोअर्स | रुपये | २३४६०.०० |
| ५. | कॉन्टिन्जेंसीज चार्जेस | रुपये | ५२७५.०० |
| | | रुपये | ८०६३५.०० |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन शाखा पारशिवनी येथील इमारतीचे खिडक्यांना कांचा बसविणे, पेंटींग व रंगरंगोटी इत्यादि तसेच इतर अनुषंगिक कामे पूर्ण करणेकरिता सादर केलेले रुपये ८०६३५/- चे अंदाजपत्रक व त्यावरील आर्किटेक्ट फी ३२२५/- व आर्किटेक्ट फीवरील ५% प्रमाणे सर्विस टॅक्स रुपये १६१/- ला मंजुरी देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६(२) :- नियोजित शाखा निंबा येथील किरायाचे इमारतीत काउंटर फर्निचरचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

ठराव क्रमांक ६(२) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, पारशिवनी तालुक्यातील निंबा येथे बँकेची नविन शाखा उघडण्यास

मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पूणे यांनी दिनांक १३ नोव्हेंबर २००१ चे पत्राप्रमाणे मंजुरी दिलेली आहे. निंबा परिसरांतील जनतेची बँकींग विषयक अडचणी सोडविणेकरिता त्वरित शाखा उघडून कामकाज करण्याचे हष्टीने काउंटर फर्निचरची व्यवस्था करून घेण्यास बँकेच्या पॅनेलवरील आर्कीटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांना सदर कामाकरिता येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक मागितले असतां त्यांनी खालील प्रमाणे सादर केले आहे

| | | |
|---|---|---|
| १. प्रोव्हायडींग व फिक्सींग कांउटर १२ एम. एम. पार्टिकल बोर्ड विथ मायका शिट | रुपये | २१,०००.०० |
| २. प्रोव्हायडींग व फिक्सींग केबीन पार्टीशन ॲल्युमिनियम शिट | रुपये | ११२५०.०० |
| ३. प्रोव्हायडींग व फिक्सींग कॅशकेबीन पार्टीशन | रुपये | १९५००.०० |
| ४. प्रोव्हायडींग व फिक्सींग नोटीस बोर्ड | रुपये | १५००.०० |
| ५. प्रोव्हायडींग व फिक्सींग रायटींग टेबल | रुपये | १५००.०० |
| ६. प्रोव्हायडींग व फिक्सींग बेंचेस ऑफ टिकवुड | रुपये | ६०५०.०० |
| ७. कॉन्टीजेन्सीज चार्जेस | रुपये | ४३०५.०० |
| | एकूण रुपये | ६५८०५.०० |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन पारशिवनी तालुक्यातील निंबा येथे नविन शाखा सुरू करणेकरिता फर्निचर व काउंटरची कामे करण्याकरिता सादर केलेले रुपये ६५८०५/- चे अंदाजपत्रक आर्कीटेक्ट फी अंदाजपत्रकावरील रकमेचे ४% प्रमाणे रुपये २६३२/- व आर्कीटेक्ट फी वरील रकमेचे ५% प्रमाणे सर्व्हिस टॅक्स रुपये १३२/- सह खर्चाचे अंदाजपत्रक मंजुर करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

---

विषय क्रमांक ६(३):- शाखा कळमेश्वर येथील इमारतीचे कंपाउंड वाल दुरुस्ती, पाण्याचे टाक्यावरील स्लॅब, खिडक्यांचे काच, इमारतीची रंगरंगोटी व इतर किरकोळ कामाचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

ठराव क्रमांक ६(३):- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या कळमेश्वर येथील शाखा इमारतीचे मेंटेनन्स वर्क्स, पेंटींग ग्रिलींग, फॅन हुक्स, इलेक्ट्रीकल रिपेअरिंग वर्क्स, ग्रिल गेट दुरुस्ती, कंपौंडवाल दुरुस्ती व अनुषंगिक इतर किरकोळ कामे करणे आवश्यक झाल्याने सदर कामाकरिता खर्चाचे अंदाजपत्रक बँकेचे पॅनेलवरील आर्कीटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांचेकडून मागविण्यांत आले. त्यांनी खालील प्रमाणे अंदाजपत्रक सादर केले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. प्रोव्हायडींग व फिक्सींग थिक ग्लास | रुपये | ९००.०० |
| २. रिप्लेसींग एक्झीस्टींग ग्लास ऑफ विंडोज | रुपये | २२०००.०० |

३. इमारतीचे आंतील दुरुस्ती, पंख्याकरिता नविन बुसस लावणे, इलेक्ट्रीकल कामाची दुरुस्ती, ग्रिल गेट बसविणे कपॉर्डवाल दुरुस्ती इत्यादि — रुपये ५०००.००
४. पाण्याचे टाकयावरील स्लॅब — रुपये ५०००.००
५. प्रोव्हायडींग बिजनेस स्पेस वीथ फ्लोअरींग — रुपये ४०००.००
६. प्रोव्हायडींग अँड लायींग ओव्हर कॉंक्रीट फ्लोअरींग — रुपये २६७००.००
७. इमारतीचे बाहेरुन वाटरप्रुफ सिमेंटपेंट — रुपये ४१८००.००
८. प्रोव्हायडींग व फिक्सींग स्ट्रक्चरल स्टील वर्क्स — रुपये ११२५०.००
९. प्रोव्हायडींग व फिक्सींग जी.आय.डिट — रुपये ११९४४.००
१०. कॉन्टिंजेंसीज चार्जेस — रुपये ९११३.००

एकुण रुपये १३९३०७.००

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कळमेश्वर शाखेच्या इमारतीचे मेंटेनन्स वर्क्स, दुरुस्ती करिता बॅंकेचे पॅनेलवरील आर्कीटेक्ट यांनी सादर केलेले अंदाजपत्रक रुपये १३९३०७.००, आर्कीटेक्ट फी रुपये ५५७२.०० व सर्व्हिस टॅक्स रुपये २७९.०० सह मंजुर करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६(४) :- उमरेड येथील बँकेच्या मालकीच्या जागेवर चेनलिंक कंपाउंडचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

ठराव क्रमांक ६(४) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, उमरेड येथील वार्ड क्रमांक १४ या ठिकाणी बँकेची १२५१० चौ.फुट जागा आहे. या जागेवर अतिक्रमण होऊ नये व जागेची सुरक्षितता राखण्याचे दृष्टीने तारेचे कंपाउंड असणे आवश्यक असल्यामुळे बँकेचे पॅनेलवरील आर्कीटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांचेकडून चेनलिंकचे कंपाउंडकरिता येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक मागविण्यांत आले. त्यांनी सदर खर्चाचे अंदाजपत्रक खालील प्रमाणे सादर केले आहे.

१. एकुण कामाचे अंदाजपत्रक — रुपये ४५४७८.००
२. अंदाजपत्रकाचे रकमेवर ४% प्रमाणे आर्कीटेक्ट फी — रुपये १८१९.००
३. आर्कीटेक्ट फी वरील ५% प्रमाणे सर्व्हिस टॅक्स — रुपये ९१.००

एकुण रुपये ४७३८८.००

विषयावर सविस्तर चर्चा होऊन उमरेड येथील बँकेचे मालकीच्या जागेवर चेनलिंकचे कंपाउंड साठी बँकेचे पॅनेलवरील आर्कीटेक्ट यांनी सादर केलेल्या रुपये ४५४७८.०० चे अंदाजपत्रक आर्कीटेक्ट फी रुपये १८१९.०० व सर्व्हिस टॅक्स रुपये ९१.०० सह मंजुर करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६(५) :- बिगर शेती कर्ज घेण्याकरिता बँकेचे नाममात्र सभासदत्व प्रदान केलेल्या नाममात्र सभासदांची माहिती देणे.

ठराव क्रमांक ६(५) :- मा० अध्यक्ष यांनी दिलेल्या सुचनेनुसार सरव्यवस्थापक यांनी सभेला माहीती देतांना सांगितले की, बँकेकडून बिगर शेती कर्ज घेणाऱ्यास बँकेचे उपविधीतील तरतुदीप्रमाणे निर्धारित असलेली सभासद फी रूपये १०/- आकारून मा० संचालक मंडळाचे/व्यवस्थापक समितीचे सभेत नाममात्र सभासदत्व मंजुर केले जाते. परंतु बिगर शेती कर्ज घेणाऱ्या सभासदांची गरज व नाममात्र सभासदत्व मिळण्यास होणारा विलंब विचारात घेउन नाममात्र सभासदत्व मंजुर करण्याचे अधिकार बँकेचे अध्यक्ष यांना दिनांक ६ जुन २००१ रोजी झालेल्या मा० संचालक मंडळाचे सभेतील ठराव क्रमांक १४ अन्वये देण्यांत आले आहे. सदर निर्णयाला अनुसरून उपविधीप्रमाणे नाममात्र सभासदत्वाकरिता निर्धारित फी रूपये १०/- आकारून दिनांक ६ जून २००१ नंतर जानेवारी २००२ अखेरपर्यंत झालेल्या नाममात्र सभासदांचे सभासदत्वास मा० अध्यक्ष महोदय यांनी मंजुरी केल्याबाबत सभेला थोडक्यात माहिती दिली. दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यात आली.

---

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(सही) (सही)

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक म., नागपूर.

२८/२/२००२

बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा गुरुवार दिनांक २८.२.२००२ रोजी दुपारी ७.०० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांतील" बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

१. मा. श्री. सुनील केदार — अध्यक्ष
२. मा. सौ. आशाताई महाजन — उपाध्यक्षा
3. मा. श्री. श्री. वं. शहाणे — सदस्य
४. मा. श्री. व. श्रा. वांढे — "
५. मा. श्री. श्री. ग. धवड — "
६. मा. श्री. ग. के. शाहीर — "
७. मा. श्री. मु. भि. पन्नासे — "
८. मा. श्री. चं. तु. समर्थ — "
९. मा. सौ. स्मिताताई कुंभारे — सदस्या
१०. मा. श्री. ए. एन. चौधरी — सरव्यवस्थापक

अनुपस्थित.

१. मा. श्री. अ. य. गुजर — सदस्य
२. मा. श्री. व. क. पारशिवकर — "
3. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
४. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक) नागपूर.
५. मा. विभागीय अधिकारी, म. रा. सह. बँक, विभागीय कार्यालय, नागपूर.

सभेला उपस्थित नसलेले मा. श्री. अ. य. गुजर व मा. श्री. व. क. पारशिवनीकर यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली. यानंतर विषयपत्रिके वरील विषयानुसार सभेला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून मा. अध्यक्ष यांनी सभेला सुरुवात केली.

---

विषय क्रमांक १ :- मागील दिनांक ३१.०१.२००२ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक ३१.०१.२००२ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक २ :- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा. सरव्यवस्थापक यांनी मागील दिनांक ३१.०१.२००२ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची थोडक्यात माहिती सभेला दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ :- बँकेचे माहे जानेवारी २००२ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे माहे जानेवारी २००२ मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ४ :- बँकेच्या दिनांक २५.१.२००२ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या दिनांक २५.१.२००२ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ५ :- बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आलेल्या सहकारी संस्थेचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, निर्मल उज्वल कंझुमर्स को-ऑप. सोसा. मर्या. नागपूर या सहकारी संस्थेने बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आवश्यक कागदपत्रांसह बँकेकडे अर्ज सादर केला आहे. संस्थेचे चालु ठेव खाते बँकेचे सक्करदरा शाखेत आहे व त्यावर संस्थेचे व्यवहार सुरु आहेत. सदर संस्थेचे कंझुमर्स स्टेअर्स नंदनवन या ठिकाणी सुरु आहे. सदर संस्था नोंदणी क्रमांक एनजीपी/सीटीवाय/१/सीओएन/३४७ दिनांक २४.०.१९९८ अन्वये प्रंजीकृत झाली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्मल उज्वल कंझुमर्स को-ऑप. सोसायटी म. नागपूर या संस्थेला बँकेचे सभासदत्व देण्याचे मान्य करण्यांत आले असून सदर संस्थेला सभासदत्व फी व प्रवेश फी भरणेकरिता पत्र देण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ :- मा. अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ६(१) :- बँकेतील कर्मचाऱ्यांना धान्य पेशगी बाबत

ठराव क्रमांक ६(१) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेतील कर्मचाऱ्यांना धान्य खरेदीसाठी दरवर्षी मार्च महिन्यांत धान्य पेशगी मंजूर करण्यांत येते व या पेशगीची वसुली कर्मचाऱ्याचे दरमहाचे पगारातून समान १० मासीक हप्त्यांत करण्यांत येत असते. दिनांक २०.४.९९ चे मा. व्यवस्थापक समितीचे सभेतील निर्णयानुसार कर्मचाऱ्यांना धान्य पेशगी देण्याची ३ वर्षाची मुदत संपली असून कर्मचारी संघाने वाढीव धान्य पेशगीची मागणी केली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेतील कर्मचाऱ्यांना धान्य खरेदीसाठी नेहमीच्याच अटीवर खालील प्रमाणे धान्य पेशगी मंजूर करण्यांत येत आहे. तथापि खालीलप्रमाणे दर्शविलेल्या धान्य पेशगीचे रकमेत यापुढे ५ वर्षपर्यंत म्हणजे २००६ पर्यंत वाढ केली जाणार नाही असे ठरले.

| अ.क्र. | कर्मचारी श्रेणी | धान्य पेशगीची रक्कम. |
|---|---|---|
| १. | उपमुख्याधिकारी व त्यावरील श्रेणी | रुपये ७५००.०० |
| २. | लिपिक, "ब" वर्ग अधिकारी व अ वर्ग अधिकारी | रुपये ६५००.०० |
| ३. | ड्रायव्हर व चपराशी श्रेणी | रुपये ५५००.०० |

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६(२) :- परिसर अभियांत्रीकी व जलनिःसारण कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. नागपूर कडील थकित कर्जाचे वसुलीसाठी सहकारी न्यायालयांत महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६० कलम ९१ अंतर्गत दावा दाखल करणेबाबत.

ठराव क्रमांक ६(२) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, परिसर अभियांत्रीकी व जलनिःस्सारण कर्मचारी सहकारी पत संस्थेचे कार्यालय मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचे परवानगीने

नागपूर येथे हलविल्यामुळे व संस्थेचे कार्यक्षेत्र नागपूर विभाग असल्याने संस्थेने मागणी केल्याप्रमाणे संस्थेला आपले बँकेचे सभासद देऊन संस्थेला भंडारा जिल्हा सहकारी बँकेचे कर्जपरतफेडीकरिता दिनांक ८ जानेवारी १९९८ ला रुपये ७९८.०६ लाख मुदती कर्ज मंजूर केले होते. त्यानंतर नोव्हेंबर १९९८ पर्यंत संस्थेचे वेळोवेळीचे मागणीप्रमाणे रुपये ८८.०१ लाख मुदती कर्ज मंजूर केले आहे. बँकेत वसुली भरणेबाबतचा संस्थेचा ट्रेंड पाहता सुरुवातीचे जानेवारी ९८ नंतर फक्त ऑगस्ट ९८ पर्यंतच म्हणजे ८ महिने कर्जाची परतफेड नियमित केल्याचे दिसून येते त्यानंतर मात्र कर्जाची परतफेड नियमितपणे झाली नसून दरमहा कर्जाची (मुद्दलाची) व व्याजाची वसुली पूर्णपणे झाली नाही. संस्थेकडे रुपये ७३६.६४ लाख मुद्दल व रुपये २०.८६ लाख व्याज असे एकूण रुपये ७५७.५० लाख कर्ज थकित झाले आहे.

थकित कर्ज वसुलीकरिता संस्थेला वेळोवेळी भेटी देण्यांत आल्या. तसेच रेकार्ड तपासणी करिता रेकार्ड मागण्यांत आला परंतु संस्थेने तपासणीकरिता रेकार्ड उपलब्ध करून न देता टाळाटाळ केली. म्हणून सहकार खात्यास व विशेष लेखा परिक्षक यांना कळविण्यांत आले आहे. बँकेने कर्जवसुलीकरिता प्रयत्न करूनही संस्थेकडील कर्ज वसुल झाले नाही.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन संस्थेकडील कर्जवसुलीकरिता परिसर अभियांत्रिकी व जलनि:स्सारण कर्मचारी सहकारी पत संस्था मर्यादित या संस्थेवर बँकेचा अधिकारी प्रशासक नेमणेकरिता मा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना प्रस्ताव पाठवून विनंती करण्यांत यावी असे ठरले

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

(स्वाक्षरी) (स्वाक्षरी)

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कॉऑपरेटिव्ह बँक लि, नागपूर.

बँकेच्या मा॰ व्यवस्थापक समितीची सभा शनिवार दिनांक 30.03.2002 रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेचे अध्यक्ष मा.श्री सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित.

१. मा.श्री सुनिल केदार — अध्यक्ष
२. मा.सौ. आशाताई महाजन — उपाध्यक्षा
3. मा.श्री. श्रा.चं. शहाणे — सदस्य
४. मा.श्री. व.भा. वांढे — "
५. मा.श्री. अ.य. गुजर — "
६. मा.श्री. शा.ग. धवड — "
७. मा.श्री. ग.के. शाहिर — "
८. मा.श्री. मु.भि. पल्लासे — "
९. मा.श्री. व.क. पारशिवनीकर — "
१०. मा.श्री. चं.तु. समर्थ — "
११. मा.सौ. स्मिताताई कुंभारे — सदस्या
१२. मा.श्री बी.व्ही. असवार, विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह.संस्था(बँक), नागपूर
१३. मा.श्री. एस.एस. गोडे. — प्रभारी व्यवस्थापक.

अनुपस्थित.

१. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
२. मा. विभागीय अधिकारी, म.रा.स. बँक म., विभागीय कार्यालय, नागपूर.
3. मा.श्री. ए.एन. चौधरी, सरव्यवस्थापक.

सभेला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांनी विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरुवात केली.

विषय क्रमांक १:- मागील दिनांक २८.२.२००२ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १:- मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक २८.२.२००२ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

---

विषय क्रमांक २:- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा. प्रभारी व्यवस्थापक यांनी मागील दिनांक २८.०२.२००२ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेला थोडक्यांत माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ३ :- बँकेचे माहे फेब्रुवारी २००२ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होउन माहे फेब्रुवारी २००२ मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजुर.

---

विषय क्रमांक ४ :- बँकेच्या दिनांक २२.२.२००२ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला जोंदगीच्या परिस्थितीची सभेत नोंद "घेण्यांत आली" घेणे.

ठराव क्रमांक ४ :— "ठराव सर्वानुमते मंजुर" मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. व बँकेच्या दिनांक २२.२.२००२ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला जोंदगीच्या परिस्थितीची सभेत नोंद घेण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५ :- मा. अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ५(१) :- कापूस एकाधिकार योजनेत खरेदी केलेल्या कापसाचे चेकचे तारणावर कर्ज उपलब्ध करून देणेबाबत.

ठराव क्रमांक ५(१) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगीतले की, मा. कर्ज उपसमितीचे दिनांक २१.१२.२००१ चे सभेतील निर्णयानुसार कापूस एकाधिकार योजनेत खरेदी केलेल्या कापसाच्या चेकचे तारणावर ८०% कर्ज दरसाल दरशेकडा १२% व्याजदराने शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. परंतु पणन महासंघाचे निर्देशानुसार खरेदी विक्री

संघानी पोस्टडेटेड चेक देणे बंद केले आहे त्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय झाली आहे. त्यासोबतच आपल्या बँकेची कर्जवसुली पण प्रभावित झाली आहे यावर मा॰ सचिव, सहकार व वस्त्रोद्योग, मंत्रालय, महाराष्ट्र सरकार, मुंबई यांचेशी चर्चा करण्यांत आली असून असे सुचविण्यांत आले की पोस्टडेटेड चेक देण्यामधील संभाव्य धोका टाळण्याकरिता खरेदी विक्री संघाने केवळ जिल्हा बँकावर देय चेक जारी केल्यास तोडगा निघू शकतो. व जिल्हा सहकारी बँक कापूस चेक तारण कर्ज योजना राबवू शकते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन जिल्हा सहकारी बँकेत कापूस चेक तारण कर्ज योजना सुरु ठेवण्याचे दृष्टीने महाराष्ट्र सरकारचे संबंधित विभागाशी पत्र व्यवहार करण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर

---

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा॰ अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

प्रभारी व्यवस्थापक　　　　　अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल कोऑपरेटीव्ह बँक लिमी; नागपूर.